www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती आमले   उपसंपादक - श्री विलास गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश पाटील   सह संपादक - श्री मुकुंद कांबळे   महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३   अंक : २८   सोमवार दि. ०६ ऑक्टोबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ८   RNI MAHMAR/2023/89514

# कुंभमेळ्यासाठीची कामे दर्जेदार व गतीने पूर्ण करा

## मुख्यमंत्री : नवीन रिंगरोड साधूग्राम त्वरित पूर्ण करावे

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**मुंबई :** कुंभमेळा श्रद्धा आणि सांस्कृतिक व धार्मिक परंपरेचे प्रतीक असल्याने नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळयासाठीची पायाभूत सुविधांची सर्व कामे दर्जेदार व गतीने पूर्ण करण्यात यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. नाशिकमधील नवीन रिंगरोडचे काम कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करावे तसेच साधूग्राम, टेंट सीटीसाठीची भूसंपादनाची कामेही गतीने पूर्ण करावीत, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ची आढावा बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, पणनमंत्री जयकुमार रावल, नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, मुख्य सचिव राजेशकुमार, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला,



संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सिंहस्थ कुंभमेळा हा धार्मिक श्रद्धेचे प्रतीक असल्याने संपूर्ण कुंभमेळा कालावधीत रामकुंडात आणि नेहमीसाठीच नदीपात्रातील पाणी स्वच्छ राहील, हे कटाक्षाने पाहावे.

### दिरंगाई चालणार नाही

1) नाशिकमधील नवीन रिंगरोडचे काम त्वरित पूर्ण करावे. या कामात दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक निधी त्वरित मंजूर करून घ्यावा. इतर रस्त्यांची कामेही त्वरित हाती घेण्यात यावी.
2)कुंभमेळ्याच्या प्रचार प्रसिद्धीसाठी 'डिजिटल कुंभ' ही संकल्पना राबविण्यात यावी. प्रचार प्रसिद्धीसाठी स्वतंत्रपणे वेगळा आराखडा तयार करून नियोजन करण्यात यावे.
3)कुंभमेळ्यासाठीच्या आवश्यक कामांसाठी जिल्हास्तरावरील नोकरभरतीलाही गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.
4) विविध आखाड्यांशी चर्चा करून त्यांच्या गरजेनुसार साधूग्राममध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.
5)सीसीटीव्ही कॅमेरे प्रणाली केंद्रिकृत पद्धतीने तयार करण्यात यावी.

## सपकळवाडी ग्रामस्थानी धरली माणुसकीची कास



**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सपकळवाडी गाव सामाजिक बांधिलकी जपण्यात नेहमीच अग्रेसर असते. पूर परिस्थिती असो किंवा मराठा आरक्षणासाठीचे जरांगे पाटील यांचे आंदोलन असो, सपकळवाडीचे ग्रामस्थ मदतीसाठी नेहमीच तत्पर असतात.इंदापूर तालुक्यात सामाजिक कार्यात या गावाने नेहमीच आपला वेगळा ठसा तालुक्यात उमटवला आहे. या गावातील युवा तरुणांची एकजूट असल्यामुळे सार्वजनिक कामाला सर्वजण आपले मतभेद बाजूला ठेऊन एकत्र येऊन काम मार्गी लावतात.

सध्या धाराशिव, सोलापूर, बीड आणि लातूर जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेल्या पूर परिस्थितीमुळे मोठे नुकसान झाले आहे. या संकटात सपकळवाडीच्या सर्व युवकांनी मदतीचे आवाहन केले आणि गावाने केवळ दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात आवश्यक व गरजेच्या वस्तू जमा केल्या.

**दोन दिवसांत जमा झाली मदत सामुग्री**

गावातील महिला बचत गट, प्रगती महिला ग्रामसंघ, मजूर महिला आणि सर्व शेतकरी यांनी एकत्रित येऊन दोन दिवसांत तातडीची मदत सामुग्री जमा केली. यामध्ये पोहे, रवा, साखर, आटा, चहा पावडर, गोड तेल, मीठ, फरसाण, कोलगेट, बिस्किटे, साबण, तिखट, हळद यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता.

याशिवाय,अंगणवाडीच्या मुलांसाठी पाटी,पेन्सिल,बॅग आणि खाऊ, तर गरोदर महिलांसाठी वजनकाटा अशी विशेष मदतही पुरवण्यात आली. ही मदत मुलांना आणि महिलांना मिळाल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य नक्कीच सुखदायक होते.




## रयत शिक्षण संस्थेच्या 'कार्यक्षम गुरुकुल प्रमुख' या पुरस्काराने 'श्री. संजय रा.म्हात्रे सर,' यांना सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

**सातारा :** फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा समर्थ वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेचा शैक्षणिक क्रांती घडवून आणणारा वटवृक्ष ४ ऑक्टोबर १९१९ रोजी लावला आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचवून भागीरथी कार्य केले. या रयत शिक्षण संस्थेचा ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सातारा येथे *'१०६ वा' वर्धापन दिन साजरा करण्यात आला. संपूर्ण महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात मिळून ७०० पेक्षा अधिक शैक्षणिक शाखा सुरू असलेल्या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. या उपक्रमा पैकी 'गुरुकुल'* हा प्रकल्प राबवण्यात येतो . आज संस्थेच्या वर्धापन दिनी सातारा येथे, आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्रातील ग्रामीण कवी *' इंद्रजीत भालेराव', रायगडचे भाग्यविधाते संस्थेचे मॅनेजिंग कॉन्सिल सदस्य माजी. खासदार 'मा.श्री.रामशेठ ठाकूर






साहेब', संस्थेचे चेअरमन 'मा. श्री. चंद्रकांत दळवी साहेब.'* यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन. या विद्यालयात गुरुकुल प्रमुख म्हणून कार्यरत असलेले शिक्षक *' श्री.संजय म्हात्रे सर '* यांना *'कार्यक्षम गुरुकुल प्रमुख'* या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे, रायगड विभागाचे चेअरमन *' श्री. बाळाराम पाटील साहेब', संस्थेचे माजी चेअरमन 'डॉ. अनिल पाटील साहेब', जनरल बॉडी सदस्य ' श्री. डी. बी. पाटील सर', रायगड विभागाचे विभागीय अधिकारी ' श्री. कोंगेरे साहेब ', सहाय्यक विभागीय अधिकारी 'श्री. जगताप साहेब ' ,क.भा. पाटील विद्यालयाचे कार्यप्रवण चेअरमन ' श्री. जीवन गावंड साहेब', दहागाव माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष ' श्री. कृष्णा पाटील साहेब', पिरकोन ग्राम पंचायत चे माजी सरपंच विद्यालयाचे व्हाईस चेअरमन 'श्री.रमाकांत जोशी साहेब', जेष्ठ लेखक से. नि. प्राचार्य ' श्री. ए.डी.पाटील सर ',सामाजिक कार्यकर्ते भाजप उरण चे उपाध्यक्ष श्री. मुकुंद गावंड साहेब ', भाजपा ओबीसी सेलचे अध्यक्ष ' श्री. प्रा. प्रमोद म्हात्रे सर' विभागीय कार्यालयातील वरिष्ठ लेखनिक 'श्री. गुजर सर, द्वितीय लेखनिक ' श्री. वैभव गावंड सर ,विद्यालय विद्यालयाच्या प्राचार्या ' सौ. ए. ए. पाटील मॅडम, विद्यालयातील गुणी शिक्षक श्री. पी एम पाटील सर, श्री. बी बी. डढाळे सर, सर्व शिक्षक वृंद या सर्वांनी पुरस्कार प्राप्त शिक्षक ' श्री. संजय म्हात्रे सर'* यांचे अभिनंदन केले . तसेच त्यांना पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्रवादी महिला काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश तर्फे नवदुर्गा महिला सन्मान प्रदान सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड.**

उरण तालुका | राष्ट्रवादी महिला काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने आयोजित "नवदुर्गा महिला सन्मान" कार्यक्रमांतर्गत उरण तालुक्यातील दिव्यांग महिलांचा गौरवपूर्वक सन्मान करण्यात आला. समाजातील सत्य, न्याय आणि सुकर्म यांच्या मूल्यांची जपणूक करत विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या आणि प्रेरणादायी कार्य करणाऱ्या महिलांना हा सन्मान समर्पित करण्यात आला.

समाजाच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या अशा महिलांना "आई दुर्गेचे रूप" मानत त्यांना "नवदुर्गा सन्मानपत्र" देऊन गौरविण्यात आले.

दिव्यांगत्वावर मात करून सामाजिक जाणीव ठेवत कार्य करणाऱ्या या महिलांनी शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.शासनासोबत समाजाच्या प्रगतीत मोलाचे योगदान






दिल्याबद्दल त्यांना हा मानाचा सन्मान बहाल करण्यात आला.सन्मानित महिला पुढीलप्रमाणे :१) रणिता ज्योती जयराम ठाकूर-कोप्रोली(सामाजिक कार्यकर्ती व पत्रकार)२) सौ. रचना दत्तात्रेय ठाकूर–वेश्वी३) मानसी रोहिदास मोहिते–दादरपाडा ४) वंदना अंकुश कातकरी-वेश्विवाडी.

या विविध क्षेत्रातील कार्यकर्त्या महिलांचा "नवदुर्गा महिला सन्मान" देऊन गौरव करण्यात आला. सन्मान स्विकारताना सर्व महिलांनी व्यक्त केले की, "हा सन्मान केवळ आमचाच नसून संपूर्ण उरण तालुक्यातील दिव्यांग महिलांचा गौरव आहे. या प्रेरणेने आम्ही आणखी जोमाने सामाजिक कार्य करत राहू."

सदर सन्मान सोहळ्यावेळी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती : वैजनाथ ठाकूर–माजी जिल्हा परिषद सदस्य, कुंदाताई वैजनाथ पाटील–राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्षा, उरण तालुका,अजित वसंत पाटील- वेश्वी सरपंच,पद्माकर किसण मडवी–उद्योगपती, राजेंद्र गजानन पाटील–उपाध्यक्ष, दिव्यांग सामाजिक संघटना, आकाश खैरे–ग्रामपंचायत सदस्य, सदर मान्यवरांनी उपस्थित राहून सन्मानित महिलांचे कौतुक केले. या कार्यक्रमामुळे उरण तालुक्यातील इतर दिव्यांग महिलांनाही प्रेरणा मिळेल, अशी भावना सर्वच स्तरांतून व्यक्त होत आहे.

## थोडक्यात

### एक दिवसीय दांडिया रासचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

एकता मित्र मंडळ युगांतक कॉलनी, सुकापुर यांच्यातर्फे सहा ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमे निमित्ताने एक दिवसीय दांडिया रासचे आयोजन करण्यात आले आहे.

निंबेश्वर कुंज, गणेश मंदिरासमोर, भारतीय जनता पार्टी ऑफिस, सुकापुर येथे या एक दिवसीय दांडिया रासचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी सात ते रात्री दहा वाजेपर्यंत दांडिया रास आणि मसाला दूध वाटप केले जाणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन अमित जाधव, जिल्हाध्यक्ष उत्तर रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा भाजपा यांनी केले आहे.

### पंचवीस वर्षीय तरुण बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

दुकानातून तंबाखू आणण्यासाठी जातो असे म्हणून कामावरुन निघून गेलेला 25 वर्षीय सुनील सुधाकर शिरसाट (बापदेव वाडी) हा घरी परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.

त्याचा बांधा सडपातळ, रंग सावळा, केस काळे आहेत. त्याची उंची पाच फूट, आठ इंच असून अंगात पिवळ्या रंगाचा हाफ बायांचा शर्ट त्यावर हिरव्या पानांचे चित्र, निळया रंगाची फुल पॅन्ट घातली आहे. त्याला मराठी भाषा बोलता येते. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस शिपाई लक्ष्मण वारगुडे यांच्याशी संपर्क साधावा.

### कामोठे स्मशानभूमीत धुराची चिमणी बसवून विद्युत व्यवस्था करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे स्मशानभूमीत धुराची चिमणी बसवून या ठिकाणी पुरेशी विद्युत व्यवस्था करण्याची मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार शंकर भगत यांनी पनवेल पालिका आयुक्त यांच्याकडे केली.

कामोठे प्रभागातील सेक्टर 15 येथे संपूर्ण कामोठे शहरा करता एकच स्मशानभूमी असून ही स्मशानभूमी दाट लोकवस्तीच्या मध्यवर्ती भागात आहे. त्यामुळे या ठिकाणी पार्थिवावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर धुराचा त्रास सभोवताली राहणाऱ्या नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे या स्मशानभूमीमध्ये धुराची चिमणी बसवणे आवश्यक आहे. तसेच या ठिकाणी पुरेशी विद्युत व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळेस मोठी समस्या निर्माण होते. त्यामुळे या ठिकाणी विद्युत व्यवस्था वाढवणे आवश्यक आहे. या मागणीचे पत्र माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी पालिका आयुक्त यांना दिले आहे.

### वाहन नोंदणीसाठी नवी क्रमांक मालिका

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) वाहन नोंदणीसाठीची एम एच 46 सी यु मालिका संपुष्टात येत असून आता एम एच 46 डीसी ही नवीन मालिका सुरू करण्यात आली आहे.

सोमवारी 6 ऑक्टोबर रोजी सकाळी दहा ते दुपारी एक या वेळेत पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे नवीन नंबर नोंदणीसाठी चे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. अर्ज मंजूर झाल्यानंतर लगेचच किंवा पुढील दिवशी शुल्काचा धनादेश जमा करणे आवश्यक असणार आहे. एखाद्या क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास मंगळवार सात ऑक्टोबर रोजी दुपारी चार वाजता लिलाव प्रक्रियेतून क्रमांक वाटप केले जाणार आहेत. आकर्षक पसंतीच्या नोंदणी क्रमांकाचे शुल्क भरणा केलेल्या दिनांकापासून 180 दिवसापर्यंत संबंधित क्रमांक आरक्षित राहील. या कालावधीत वाहनाची नोंदणी न केल्यास 180 दिवसानंतर आरक्षित वाहन क्रमांक हा अनारक्षित समजला जाईल आणि शुल्काचा परतावा केला जाणार नाही.

# शेतकरी आंदोलनाची दिशा बदलली, अन्रा जकारणाचे खाईत गटारगंगा झाली ! - धनंजय पाटील काकडे (ज्येष्ठ साहित्यिक)

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे**

मागील काही वर्षात शरद जोशींच्या नेतृत्वातील दिल्ली आंदोलनाची आठवण डोळ्यासमोर येते. त्यावेळी महेंद्रसिंग टिकेत ने शेतकरी संघटनाचे आंदोलन निस्तनाभूत व मोडण्याचा प्रयत्न केला होता. दिल्ली येथे लाखो शेतकऱ्यांची फजिती केली. शेतकरी विरोधी कायदे, जनुकीय बियाणे, किंवा लोक संख्या वाढीनुसार तांत्रिक अडचणी सोडवून उत्पादन वाढविले जाणे हे गरजेचे असते, आणि अजूनही तेच राकेश टिकेत हे जर चुकीचे निर्णय घेऊन शेतकऱ्यांची दिशाभूल करीत असेल ,तर त्याचा सहकारी बच्चू कडू हा कसा शेतकऱ्यांचा नेता होऊ शकतो . राकेश टिकेतच्या मागे महाराष्ट्रातील धुरंदर राज्यकर्त्यांची पाठीमागून फूस लावून फळी आहे, हे मागील दिल्ली आंदोलनात जाणाऱ्यांनी पुन्हा तेच धाडस करून दाखवून दिले आहे. म्हणजे शरद जोशींची अर्थनीती संपवून चुकीचे मार्ग निवडले जात आहेत, हे ध्यानात ठेवावे लागेल , ही तर जनतेला बेवकूफ बनविण्याची लक्षणे व दिशाभूल आहे. काँग्रेसच्या सोबत असले तर भाजपाला शिव्या द्यायचे ! आणि त्यांच्याच मांडीला मांडी लावून बसणारे हे नेते आहेत. भाजपासोबत सत्तेत असेल तर काँग्रेसला शिव्या द्यायचे ,आणि आता तर फक्त देवाभाऊ व बी.जे.पी.ला शिव्या घालायचे आणि त्याच सरकारमध्ये असलेले शिंदे व पवार घराण्यावर एक चकार शब्द सुद्धा काढायचा नाही, ही हरामखोरी आता जनता पाहत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी राकेश टीकेतला महाराष्ट्रात फिरून अंतर्गत छूपा एजेंडा राजकीय लोकानी आखला आहे. आणि हे जर शेतकरी नेते जनतेला फसविणारे असेल तर, स्वतंत्र भारत पक्षाचा अनिल धनवट ,ललित बहाळे ,हे बच्चू कडू सोबत का गेले. हे सुद्धा लोकांना माहीत करा. एकीकडे अंगारमळयात जाऊन शरद जोशीची माती डोक्याला लावायची, आणि दुसरीकडे ज्या दिल्लीत शरद जोशीचा अपमान केला त्या राकेश टिकेतला शेतकरी नेता म्हणून महाराष्ट्रात फिरवायचे , अशा तमासखोऱ्यांनाच पहिले हद्दपार करावे लागेल.

स्वतःच्या राजकीय मतलबासाठी शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्यांना जाब विचारावा लागेल. शेतकऱ्यांचे जीवन अर्थशास्त्रीय बनवणे ही काय नाटक कंपनी आहे कां , ज्यांनी शेतकऱ्यांचे दुःख मांडून हजारो कोटीची माया जमविली, त्यांच्याच पाठीशी तुम्ही उभे राहणार आहेत का ? जेव्हा हे सत्तेत होते, तेव्हा तर काँग्रेस व बीजेपी, राष्ट्रवादीचे गाणे गात होते. आणि आता आम्ही शेतकरी नेते आहोत या फसव्यागिरीची भाषा समाजाला तुम्ही दाखवणार आहात ! राजकीय हव्यासापोटी अकलेचे तारे तोडणाऱ्यांना धडा शिकवावा लागेल . ज्यांना शेतकऱ्यांचा विचार समजत नाही, ज्यांना धोरण माहित नाही, फक्त माझ्या घरी शेती आहे आणि आमचे बेहाल झाले, सातबारा असणे एवढ्यावरून शेतकरी नेता होत नाही. तर शेतकऱ्यांच्या नावावर तमाशाचे फड उभे करणारे नेते तयार होतात, शेतकऱ्यांचा घातपात करणारे नेते आहेत, हे सिद्ध होत असते. सुकानू समितीचा घात करून जे शेतकऱ्यांना धोका देऊन सत्तेत सहभागी झाले होते, सत्तेतील नेत्यांच्या आदेशावरून शेतकरी संघटना संपवण्याचा घाट घातला जात आहे. आणि हेच नेते जर आज सत्तेत असते तर त्यांनी एकही कर्जमाफीच नव्हे तर कोणताही शेतकऱ्यांच्यासाठी आवाज उठविला नसता उलट यांनी सत्तेचे गुण गायले असते. व आम्ही कशी शेतकऱ्यांना मदत करत आहोत हे गाऊ - गाऊ सांगितलं असतं.आता कितीही शेतकरी मेले व पुरात, पाण्यात वाहून गेले असेल तरी त्याचे काळजी देवा भाऊचे सरकार करणार नाही. व सध्या कर्जमाफी देणार नाही. परंतु ज्या दिवशी निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची चिन्ह दिसेल त्या अगोदर दिवशी मात्र शेतकरी मदतीचा हात तुम्हाला बँकेत शेतकऱ्यांच्या नावावर पहायला मिळेल. आर्थिक मदत जमा होण्यास सुरुवात होईल. फक्त शासनाच्या तिजोरीतील पैशाचा उपयोग आजकाल मतदानासाठी घेतल्या जात आहे एवढेच बेगडी शेतकरी प्रेम दिसेल . कारण यांचा फक्त सत्तेत जाऊन बसण्यासाठी हा सर्व तमाशा आहे.

शरद पवार नी संपूर्ण आयुष्यभर आपले घराणेशाही जपून सत्तेत घातली. व एका जिल्ह्यात दोन दोन मंत्री करू शासनाचा पैसा लाटला. व मलिद्याचे खातेवर डोळा ठेवून राजनीती झाली असेल तरी मग शेतकरी आत्महत्या का वाढल्यात. सत्तेत असताना व नंतर ही छुप्या रस्त्याने तुम्ही तर त्या घराणेशाहीचा उदो- उदो केला. आताही काही नेते तेच करणार आहे. ज्यांनी सत्तेत असून प्रश्न सोडविले नाही ते आता गाव जमा करून शेतकऱ्यांच्या नावाने आकांत करून सोडणार आहात ! तुमचेच तर खेटर दिसत नाही. शेतकरी आंदोलनातील निस्वार्थी नेते संपविण्याचा घाट घडविले जात होता. कोणी जय विदर्भ पार्टी म्हणते, कोणी विदर्भ राज्य आंदोलन समिती म्हणते, कोणी स्वतंत्र भारत पक्ष म्हणते, कुणी शेतकरी संघटना म्हणते. तुमची माणसे आहेत किती व पक्ष जर पाच असेल तर ती चळवळ कशी चालेल . त्यातही कोणी आतून बीजेपीला सपोर्ट करते, कोणी शेतकऱ्याच्या नावावर राजकीय दलाली खाणाऱ्याच्या मागे धावते .आणि वरून शेतकऱ्याचा आव आणते, तीच ती माणसे , किती वेळा तेच ते भाषण करणार. पुढील शेतकरी व्यवस्था बदलण्यासाठी तुमची स्वतःची राजकीय व्यवस्था काय, हे जगाला दाखवावे लागेल. स्वतंत्र भारत पक्ष का वाढला नाही, ती करणे शोधावी लागेल. ती फक्त आणि फक्त शेतकऱ्यांसाठी राजकीय व्यवस्था असली तरच जनता विश्वास ठेवेल. नाहीतर आता नेपाळ सारखे शेतकऱ्याच्या नावावर ढोंगी पसारा मांडणाऱ्याला सुद्धा जनता धडा शिकवतील.

शेतकरी संघटनेच्या काही नेत्यांनी बच्चू कडूची दलाली खाणे तर सुरू केले नाही याचे तरी स्पष्टीकरण करावे . थोडेफार पैशाचे प्रलोभन दाखवून, शेतकरी संघटनेचे माणसं फोडून, शेतकरी संघटना संपविण्याचे हे कुटील कारस्थान आहे. ह्या मूठभर नेत्यांनी शेतकरी आंदोलकांना राजकीय प्रवाहासाठी वापरून घेतले जात आहे. त्यामुळे शेतकरी संघटनेचे अस्तित्व संपण्यात जमा होते काय !. ही सुद्धा भीती निर्माण झाली. जसे आंबेडकर चळवळीचे काँग्रेसने तुकडे करून व राष्ट्रवादी ने पाठिंबा देऊन आंबेडकरी चळवळ कमजोर करण्याचे प्रयत्न केलेत, तसेच शेतकरी आंदोलनाची दिशा सुद्धा भटकत आहे, व कमजोर करण्याचे दीवस चालू झालेत. त्यामुळे शेतकरी समाजात अनेक गैरसमज पसरत आहेत. अशा राजकीय सौदेगिरी करणाऱ्या दलाला सोबत जर शेतकरी संघटना जात असेल तर तिचे वाटोळे होणे नक्की ठरले आहे . शेतकरी संघटनेचा विचार विचित्र पद्धतीने भटकत चाललेला आहे असे वाटत नाही काय !, शरद जोशीने जे सांगितलं असेल ती सर्व बाब आता होऊन गेली, आता प्रत्येकाला तुम्हाला काय करायचे आहे, आता रस्त्यावरील आंदोलनातून प्रश्न सुटणार नाहीत ,तर पुढील राजनीति कशी करावी हेच ठरवावे लागेल, तेव्हाच प्रश्न सुटतील. आतापर्यंत जे सत्तेत होते त्यांनी शेतकरी प्रश्न मिटविले नाही, व पुन्हा निवडणुकीच्या माध्यमातून मते मागायला तुमच्या छातीवर बसणार आहेत. तरीपण आता राजकारणात हाऊसमध्ये गेल्याशिवाय,शेतकरी प्रश्न सुटूच शकत नाहीत, परंतु नाटकी व ढोंगी नेत्यांसोबत जाऊन अधिक फसगत होण्याचे चिन्ह ध्यानात ठेवावे लागेल. राजकारणाची दिशा बदलावी लागेल व ती राजकारणाची व्यवस्था शेतकरी हिताची असेल,तेच करावे लागेल व मात्र तमाशखोऱ्यांना सुद्धा यातून धडा शिकवावा लागेल. जय हिंद .

## रायगडमध्ये बनावट नोटा रॅकेट उद्ध्वस्त – आंचल दलालांच्या धडक कारवाईने खळबळ!

### आंचल दलाल, पोलीस अधीक्षक रायगड यांचे नेतृत्व,बेकायदा धंद्यांवर गंडांतर, जनतेत चर्चेची जोरदार लगबग

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा.**

रायगड जिल्ह्यात बनावट नोटांचा सुळसुळाट दिवसेंदिवस वाढत असताना अलिबाग पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्री थरारक कारवाई करत १२ लाख रुपयांच्या बनावट नोटा आणि नोटा तयार करण्याचे साहित्य जप्त केले आहे. या प्रकरणी सराईत गुन्हेगार भूषण पतंगे याला अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अलिबाग पोलिसांना मयेकरवाडी भागात बनावट नोटा असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर, पोलीस निरीक्षक किशोर साळे व त्यांच्या पथकाने छापा टाकला. छाप्यात ५००, २०० आणि १०० रुपयांच्या बनावट नोटा, कलर प्रिंटर व कटर जप्त करण्यात आले. आरोपीने या नोटा कुठे कुठे चलनात आणल्या, यामागे आणखी कुणी आहे का याचा शोध सुरू आहे.आंचल दलाल, पोलीस अधीक्षक रायगड म्हणाले,"बनावट चलन हा देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी गंभीर धोका आहे. अशा नोटा व्यवहारात आल्यास खऱ्या चलनाचे




मूल्य कमी होऊन महागाई वाढते. त्यामुळे संशयास्पद चलन दिसल्यास नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी.

"दरम्यान, आंचल दलाल रायगडमध्ये पोलीस अधीक्षक झाल्यापासून बेकायदा धंद्यांवर गंडांतर आले असून, जनतेमध्ये आणि विशेषतः महिलावर्गामध्ये त्यांच्या कारवाईची जोरदार चर्चा आहे.

अनेक नागरिकांचे म्हणणे आहे की, "काही वर्षांनी रायगड जिल्ह्याला कायदा-सुव्यवस्था राखणारा खरा पोलीस अधीक्षक मिळाला आहे, जो स्वतः जनतेच्या समस्या ऐकतो."

रायगड जिल्ह्यात बनावट नोटांच्या या कारवाईने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की, पोलिस प्रशासन ठाम पावले टाकत आहे.

## सेलू येथील अल्पवयीन मुलीवर शिक्षकाने ब्लॅकमेल करून केलेल्या अत्याचाराची एस आय टी मार्फत सखोल चौकशी करणे बाबत उपविभागीय पोलिस अधिकारी यांना निवेदन



**दैनिक युवक आधार**
**सेलू तालुका प्रतिनिधी (ग्रामीण):- विठ्ठल राऊत**

सेलू येथील एका नामांकित शिक्षण संस्थेतील एका शिक्षकाने एका अल्पवयीन मुलीला ब्लॅकमेल करून तिच्यावर वारंवार अत्याचार केले. ही घटना म्हणजे शिक्षकी पेशाला काळीमा फासणारी आहे. सेलू सारख्या शांत व शैक्षणिक वातावरण असलेल्या शहराला ही घटना काळीमा फासणारी आहे. लेकरांचे आई-वडील आपली लेकर शिक्षकांच्या भरोशावर शाळेत पाठवतात. शिक्षकच भक्षक झाल्यावर कसे होणार. या झालेल्या घटनेची SIT मार्फत सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच या शिक्षकाने व त्याच्या साथीदाराने अजून काय काय प्रकरण केलीत याची पण सखोल चौकशी करण्यात यावी. याशिवाय अशा प्रकरणांना चाप बसणार नाही. झालेल्या प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात यावी. व संबंधित आरोपींची गावात दिंड काढण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. नसता सेलूवासिया तर्फे तीव्र जन आंदोलन छेडण्यात येईल याची नोंद घ्यावी असे नमूद करण्यात आले आहे.यावेळी जयसिंग शेळके, रवी मोगल, अनिल केवारे, अक्षय सोळंके, अक्षय इघवे, गोविंद गायकवाड, मोहन मोरे, अनिकेत शिंदे, कृष्णा पडघन, अनिकेत शिंदे,पांडुरंग सावंत, गणेश शेवाळे, दत्ता पवार, विठ्ठल कोकर, गणेश सवने, निशिकांत रोडगे, शरद शिंदे व नागरिक उपस्थित होते...

## कळंबोली सर्कल येथे नव्याने उड्डाणपुल व भुयारी मार्गाचे काम जलदगतीने सुरू;

### मागील एका महिन्यात दहा टक्के काम पूर्ण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडून कळंबोली जंक्शनची सुधारणा करण्यात येत आहे. कळंबोली सर्कल येथे नव्याने उड्डाणपुल व भुयारी मार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. सध्या हे काम जलदगतीने सुरू असून मागील एका महिन्यामध्ये दहा टक्के काम पूर्ण झाले आहे.

आत्तापर्यंत २५० पाईल्स पूर्ण केले आहेत, तर १८ पाईल्स फाउंडेशन आणि ८ पाईल्स फ्लायओव्हरचे कास्टिंग यार्ड सुरू झाले आहे आणि १४ पाईल्स सध्या टाकण्यात आले आहेत. दरम्यान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होणार असून यापूर्वी रस्ते जोडणीचे काम आता जलदगतीने सुरू झाले आहे. कळंबोली जंक्शनवर होत असणाऱ्या वाहतूक कोंडीमधून वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे. या कामामुळे कळंबोली सर्कल येथे वाहतूककोंडी होऊ नये, यासाठी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मुंबई वाहिनीवरील पनवेल एक्झीट हा पढील



6 महिन्यांनी सुरू होणार आहे. सध्या युद्ध पातळीवर काम सुरू असून खोदकाम करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

कळंबोली जंक्शनचे काम पूर्ण झाल्यानंतर मुंबई पुणे एक्सप्रेसवे वरून जेएनपीटी, कल्याण शीळफाटा व सायन पनवेल मार्गावर जाण्यासाठी फ्लायओव्हरचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे कळंबोली सर्कल येथे पनवेलकडे व मुंबईकडे जाणारी वाहतूक कोंडी आता सुटणार आहे. तर सर्व यंत्रणा जलदगतीने कामाला लावली असल्याचे महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे आता लवकरच नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## मुरूड मध्ये मनसेकडून शेतकऱ्याला मदतीचा हात — २५ हजारांची आर्थिक मदत सुपूर्द

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी/मोहम्मद पिंजारी**

**मुरुड (ता. लातूर)** – पावसाने दिलेला आघात, उघड्यावर पडलेली पिके आणि संकटात सापडलेला शेतकरी… अशा वेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) पुढे सरसावली आहे. सामाजिक बांधिलकी आणि शेतकऱ्यांप्रती असलेली संवेदनशीलता जपत मनसेतर्फे मुरुड येथील एका शेतकऱ्याला २५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. ही मदत मनसे नेते व गृहराज्यमंत्री बाळा नांदगावकर, प्रदेश सरचिटणीस मनोज चव्हाण, प्रदेशाध्यक्ष संतोष भाऊ नागरगोजे, लातूर तालुकाध्यक्ष बालाजी धोत्रे व मुरुड शहर अध्यक्ष सोमनाथ ढोले यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आली. मनसे नेहमीच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर थेट आणि आक्रमक भूमिका घेणारा पक्ष म्हणून ओळखला जातो. पण या घटनेतून पक्षाने पुन्हा एकदा "मनसे म्हणजे केवळ आंदोलन नव्हे, तर संवेदनाही" हे



दाखवून दिले आहे. गावकऱ्यांच्या उपस्थितीत ही मदत सुपूर्द होत असताना शेतकऱ्यांच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचे अश्रू ओघळले.या प्रसंगी बोलताना बाळा नांदगावकर यांनी सांगितले की, "राज्य सरकारने शेतकऱ्यांची स्थिती प्रत्यक्ष पाहावी. पिकांचा पूर्ण नाश झाला आहे. सरकारने किमान ३० ते ४० हजार रुपये हेक्टरी मदत तातडीने द्यावी, ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना उभारी द्यावी. आज गरज आहे ती भाषणांची नाही, तर कृतीची." नांदगावकर यांनी पुढे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मागणी करताना सांगितले की, "ज्यांच्या घामावर हा देश उभा आहे, त्यांच्यावरच कर्जाचे ओझे असणे हे समाजाचे दुर्दैव आहे."

मुरुड परिसरातील शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची पाहणी करून मनसे पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला असून, इतर गरजू शेतकऱ्यांना देखील शक्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. या घटनेतून मनसेने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचा आपला निर्धार अधोरेखित केला आहे. ग्रामस्थांच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमाने मुरुड परिसरात भावनिक वातावरण निर्माण झाले असून, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा आशेचा किरण उमटताना दिसत आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# विंचूर विद्यालयात वर्धापन दिन साजरा; खासदार भास्करराव भगरे यांचा विद्यार्थ्यांवर स्नेह

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर, दि. ४ ऑक्टोबर २०२५ अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या बहुजन समाजाला ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी स्थापन झालेल्या रयत शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन आज कर्मवीर भाऊराव पाटील विंचूर विद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या स्थापनेपासून आजतागायत चाललेल्या शैक्षणिक व सामाजिक क्रांतीला उजागर करणाऱ्या या कार्यक्रमात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील व सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य नंदकुमार देवढे हे होते.

यावेळी प्राचार्य देवढे यांनी संस्थेच्या १०६ वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. "रयत शिक्षण संस्था ही केवळ शैक्षणिक संस्था नसून, सामाजिक न्याय व समानतेची ज्योत आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे आज लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली आहे," असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या पहिल्या भागात प्राध्यापक राजेंद्र टिळेकर यांनी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेमागील इतिहासावर प्रकाश टाकला. ४



ऑक्टोबर १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील काले गावी सत्यशोधक समाजाच्या मेळाव्यात भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी 'रयत शिक्षण संस्था' स्थापन करण्याचा ठराव मांडला. हा ठराव एकमताने मंजूर झाला आणि त्याच दिवशी संस्थेची पायाभरणी झाली. अस्पृश्यता, जातीव्यवस्था व आर्थिक विषमतेविरुद्ध लढत भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाचे दरवाजे उघडले. सौ. लक्ष्मीबाई पाटील यांनीही कर्मवीरांना त्यांच्या कार्यात साथ दिली असे टिळेकर यांनी सांगितले.

यानंतर राजेंद्र चांदे लाईफ मेंबर रयत शिक्षण संस्था सातारा,

यांनी रयत शिक्षण संस्थेच्या प्रशासकीय रचनेवर भाष्य केले. रयत शिक्षण संस्थेचा विविध क्षेत्रातील विस्तार या विषयी माहिती त्यांनी नमूद केली. संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार असून, विविध विभागीय समित्यांद्वारे प्रशासन चालवले जाते. असे सांगितले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्करराव भगरे हे डॉ. सुजित गुंजाळ सदस्य जनरल बॉडी रयत शिक्षण संस्था यांच्या विशेष आमंत्रणाने विद्यालयात दाखल झाले व वर्धापन दिन व दिवाळीनिमित्त आकाशकंदील बनवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कार्यशाळेला भेट देत चिमुकल्यानं केलेल्या कलाकृतीचे कौतुक केले. "कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक ध्येयाने प्रेरित होऊन अशा कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देतात. दिवाळीच्या निमित्ताने हे कंदील सामाजिक जागरूकतेसाठी उजळा देतील," असे खासदार भगरे सर म्हणाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अभ्यासाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन उपमुख्याध्यापक सुरेश वाबळे यांनी केले तर आभार विद्यालयाचे पर्यवेक्षक सुदामराव माळी यांनी मानले.

# मंगेश साबळे यांच्या उपोषणाला प्रहार जनशक्ती पक्षाचा पाठिंबा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** गेवराई पायगा गावचे सरपंच मंगेश साबळे यांनी तहसील कार्यालय सिल्लोड येथे सोमवार पासून शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी बेमुदत आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. यामध्ये प्रामुख्याने ओला दुष्काळ जाहीर करून एकरी 50 हजार रुपये सरसकट मदत करण्यात यावी, ज्या शेतकऱ्यांची शेतातील माती वाहून गेली आहे त्यांना एकरी एक लाख रुपये मदत करण्यात यावी,ज्या शेतकऱ्याचे जनावर गाय बैल म्हैस, रेडा, कुत्रा, घोडा, वाहून गेले आहे त्यांना सरसकट पन्नास हजार रुपये मदत करण्यात यावी, रब्बी हंगामासाठी बी बियाणे व खत शेतकऱ्यांना मोफत उपलब्ध करून द्यावा, शेतकऱ्यांना घराचं वीज बिल एक वर्षापर्यंत माफ करण्यात यावे, 2025- 26 या शैक्षणिक वर्षांमध्ये शेतकऱ्याच्या प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलाला शैक्षणिक फीस माफ करण्यात यावी, शेळी,मेंढी, पुरात वाहून गेलेल्या त्यांना प्रत्येक संख्यानुसार दहा हजार रुपये मदत जाहीर करावे,




पिक विमा योजनेमध्ये निकषांमध्ये जुन्या निकषाप्रमाणे बदल करून पिक विमा एक रुपया मध्ये रब्बीच्या हंगामात देण्यात यावा, ज्यांच्या घरात पुराचं व पावसाचे पाणी गेलं आहे त्यांना प्रत्येकी एक लाख रुपये मदत देण्यात यावी, वीज पडून किंवा पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या व्यक्तींच्या घरातील सदस्यांना दहा लाख रुपये मदत देण्यात यावी, शेतकरी आत्महत्या साठी दहा लाख रुपये देण्या यावे, गावाला जोडणारे रस्ते फुल वाहून गेले आहेत ते तात्काळ करणे व ज्या ठिकाणी पुलाची उंची कमी आहे तिथं उंची वाढवून देण्याबाबत, मनरेगा व पोखरा योजनेचे काम तात्काळ सुरू करणे, ज्यांच्या विहिरी घर पुराच्या पाण्यामध्ये पडझड झाली आहे त्यांना नवीन विहिरीवर घर देण्याबाबत मनरेगा व विविध योजना अंतर्गत लवकरात लवकर शासन निर्णय काढून त्यांना नवीन काम देण्यात यावे,शेतकऱ्याला मदत करताना गरीब श्रीमंत कोरड वही बागायती कच्च पक्क बांधकाम असं निकष न लावता समानतेने मदत करण्यात यावी,जनावरांसाठी तात्काळ चारा छावण्या सुरू करण्यात याव्या, ज्या शेतकऱ्याच्या बँकेच्या अकाउंट ला होल्ड केलं आहे. ते तात्काळ काढण्यात यावं, सर्व शेतकऱ्याच व शेतकऱ्याच्या मुलांनी शिक्षणासाठी काढलेले शैक्षणिक कर्ज सरसकट कर्ज माफ करण्यात यावी यासाठी आमरण उपोषण सुरु केले आहे.या उपोषणाला प्रहार जनशक्ती पक्षाने पाठींबा दिला आहे.यावेळी प्रहार जनशक्ती पक्ष तालुकाध्यक्ष अंकुश जैवळ, युवा तालुकाध्यक्ष योगेश पाटील चव्हाण, उपयुवा तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, कार्याध्यक्ष यश साळवे, सुभाष वाडेकर सोयगाव तालुका अध्यक्ष,करण सोनवणे, नितीन वाघ, सतीश शेलार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# विंचूर पत्रकार संघातर्फे अभय पाटील यांचा सत्कार

## विंचूर ते केदारनाथ मोटरसायकल प्रवास – ३,६०० किमी अंतर १३ दिवसांत

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर पत्रकार संघातर्फे लासलगाव (ता. निफाड) येथील अभय पाटील यांचा केदारनाथ मोटरसायकल प्रवासाची यशस्वी पूर्णता केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पत्रकार संघाचे सुनील क्षिरसागर, मच्छिंद्र साळुंके, राजेश भडांगे, जनार्दन चव्हाण, दत्तात्रय देरेकर, संदीप धनवटे, रोहन सरोदे, अशपाक शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

अभय पाटील यांनी विंचूर ते केदारनाथ (ये-जा) तब्बल ३,६०० किलोमीटरचा मोटरसायकल प्रवास केवळ १३ दिवसांत पूर्ण केला. एचएफ डिलक्स या साध्या दुचाकीवर त्यांनी महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान व उत्तराखंड अशी पाच राज्ये पार केली.

या प्रवासादरम्यान १२ रात्री मुक्काम केले असून दररोज सरासरी ४३० किलोमीटर अंतर कापले. रस्त्यात पाऊस, डोंगरातील दरडी, खराब हवामान अशा अडचणी आल्या तरी उत्तराखंड



शासनाने रस्ते तातडीने मोकळे केल्याने प्रवास सुरळीत पार पडला.

केदारनाथ धामात पोहोचल्यावर एकादशी निमित्त मंदिरात जवळपास अर्धा तास दर्शन घेण्याचे भाग्य त्यांना लाभले. "ही संपूर्ण यात्रा केवळ श्री केदारबाबांच्या आशीर्वादामुळे शक्य झाली," असे पाटील यांनी सांगितले.

प्रवासात पेट्रोलचा खर्च सुमारे ₹७,४१० व चार दिवसांच्या मुक्कामासाठी केवळ ₹२,४०० इतकाच खर्च आला. गाडीला कुठेही मोठा बिघाड झाला नाही, हे विशेष. प्रवासातील प्रत्येक मुक्काम ठिकाणी हॉटेल, मंदिर किंवा धाब्यांवर 'भोलेनाथ'चेच दर्शन घडल्याचा अनुभव त्यांनी व्यक्त केला.

या अनोख्या यात्रेनंतर पाटील यांनी पुढील वर्षी काठमांडू येथील पशुपतिनाथ दर्शनासाठी मोटरसायकल प्रवास करण्याचा संकल्प व्यक्त केला असून पुढील ध्येय संपूर्ण भारत मोटरसायकलने फिरण्याचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी मनसेची जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी



**दैनिक: युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**

दि. 03/10/2025 रोजी दिंडोरी तालुक्यातील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तसेच गटशिक्षण अधिकारी यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सिसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसविण्याची मागणी करण्यात आली. तसेच यापूर्वी आपल्याकडे निवेदन देऊनही शासकीय कार्यालयांमध्ये अद्याप अधिकारी वर्ग ओळखपत्र (ID Card) वापरत नसल्यामुळे त्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी ठाम मागणीही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे करण्यात आली आहे .

या प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिंडोरी तालुका अध्यक्ष नामदेव गावित यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी दत्तू धुळे, नंदु मोरे, गुलाब गांगोडे, युवराज गांगोडे नंदा कराटे, किशोरी मोरे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेलू शहरात शिक्षक व दोन युवकाकडून अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण POCSO अंतर्गत गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**सेलू तालुका प्रतिनिधी (ग्रामीण)**

**सेलू :** सेलू शहरात असलेल्या नूतन विद्यालय शिक्षण संस्थेत शिकवणाऱ्या एक शिक्षक आणि दोन युवकांकडून अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना 3 ऑक्टोबर रोजी समोर आली असून या प्रकरणी सेलू पोलीस ठाण्यात POCSO कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यावाबत सविस्तर असे की, सेलू येथील एक अल्पवयीन मुलगी नूतन विद्यालयात मागील वर्षी दहावीच्या वर्गांत शिकत होती. त्यावेळी शाळेतील शिक्षक संतोष मलसटवाड हे सहल घेऊन गेले होते. त्यावेळी संबंधित मुलगीही रूममध्ये कपडे बदलत असताना मलसटवाड याने सदरील मुलीचा कपडे बदलतानाचा फोटोकाढला व धमकी देऊन तिच्याशी शरीर संबंध प्रस्थापित केले ही घटना घरच्यांना अथवा ' कोणाला सॉगितल्यास मी हा व्हिडिओ व्हायरल करून' तुझी बदनामी करीन अशी धमकी दिली. त्यानंतर नितीन ' परदेशीया विद्यथ्यानि स्नॅपचॅटवर मला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली होती. त्यानंतर तो मला काही दिवस मित्रासारखे बोलत हाता. मात्र काही दिवसानंतर 'तों मला म्हणाला की तू अर्जुन ठाकूर याचा प्रपोज एक्सप्ट कर म्हणजे त्याच्या सोबत लग्न कर. त्यावेळी मी त्यास नकार दिला व माझे शिक्षण चालू आहे, मी फालतू धंदे करत नाही असे म्हणून टाळले. त्यानंतर अर्जुन ठाकूर हा सतत माझ्या मागे लागतं असे व मी ट्यूशन अथवा शाळेत जात असताना माझा पाठलाग करत असे त्यानंतर अर्जुन'ठाकूर यांनी एआयया तंत्रज्ञानावर माझा अश्लील व्हिडिओं तयार करून माझयाशी लग्न कर अथवा मी तुझ्या' आई व बहिणीला मारून टाकील अशी धमकी दिली. त्यानंतर अर्जुन'ठाकर हा सदरील मुलीशी सतत फोनवर संपर्क साधत असे व फोनवर जर बोलली नाही तर घरी व ट्यूशनला येऊन माझ्यावर दबाव टाकत असे.या पुढे तू कुठे बाहेर जायचे नाही, जर बाहेर जायचेच असेल तर' तोंडाला स्कार्फ लावून जायचे असे अनेक बंधने त्याने माइयावर' लादली होती. माझ्या घरी पुरेशी जागा नसल्या कारणाने मी मलसटवाड यांचेकड़े अभ्यासाकरिता ' जात असे. २८ सपटेंवर २०२५ रोजी अर्जुन ठाकूर हा मलसटवाड याच्या रूमवर आला व मला बळजबरी करू लागला. माझ्या टीशर्ट वरुण हात फिरवून माझा एक अश्लील फोटो काढला. त्यानंतर अर्जुन ठाकर याने माझ्यशी शारीरिक संबंध केले. या सर्व बेकायदेशीर गोष्टि करिता ठाकूर याला नितीन परदेशी व अन्य एका व्यक्तींने सहकार्यं केले.या गोष्टीचा व्हिडिओं काढून धमकी दिली की तू जर तुझ्या आई-वडिलांना सदरची घटना सांगितली तर हा व्हिडिओ मी वायरल करेल. त्यानंतर सदरील मुलगी ही दबावाखाली व बदनामीच्या भीतीपोटी गप्प राहिली. मात्र २९ सप्टेंबर रोजी तिच्या आई वडिलांनी तिला विश्वासात घेऊन सर्व घटनाक्रम विचारून घेतलाल या वेळी सदरील मुलीने नूतन विद्यालयाचा शिक्षक संतोष मलसटवाड याने अनेकवेळा गैरफायदा घेत शरीरिक संबंध ठेवलेले होते. अर्जुन ठाकूर यांनी देखील गैरफायदा घेत शारीरिक संबंध ठेवून मुलीला धमक्या दिलेल्या आहेत. सदरील मुलगी हीसध्या यशवंत ज्युनिअर महाविद्यालय ' येथे अकरावी इयत्तेत शिक्षण घेत असून तिने सेलू पोलिसात या बाबत लेखी तक्रार दिली आहे. सेलू पोलिसात नूतन विद्यालयाच्या संतोष मलसटवाड या शिक्षकासह अर्जुन ठाकूर व नितीन' परदेशी आणि अन्य एका आरोपीवर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. दरम्यान अल्पवयीन विद्यार्थिनींची उपजिल्हा रूग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली.या प्रकरणी बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ अंतर्गत कलम ४, ८,९ एल,९ एफ,१०,१२ तसेच भारतीय दंड संहिता आयपीसी २०२३ कलम ६४ (२)( आय), ६र (२) (एम), ६४ (२) (एफ), ७५, ७८, ३५९ (२), ३५१ (३) इ(५) "अशा विविध गुहे दाखल करण्यात आला असून तपास पोलीस निरीक्षक दीपक बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कृष्णा धायवट करत अहेत.

# उरण तालुक्यातील गावांना गोडस विकासाच्या नावाखाली शासनाने रचला मृत्युचा सापळा !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

उरण तालुक्यातील जे.एन.पि.टीच्या अनुषगांने तसेच सिडको बाधित गावांसभोवताली माल साठवणूक गोडाऊनांमुळे आणि येथील बेशिस्त रस्त्यावरील पार्कींग मुळे येथील नागरिक आपला जीव मुठीत घेऊन जगत असून सकाळी घरातून गेलेला आपला माणूस सुखरुप घरी परत येईल का नाही याची शाश्वती राहीली नाही.हाच का तो विकास आणि असाच हा विकास असेल तर तो येथील समाजाला नको आहे.काही धनधाडग्यांसाठी चाललेला हा विकास आहे अशी जनमाणसात भावना निर्माण झाली असून सिडकोच्या मालकीचे सिडको मार्फत बांधण्यात आलेले रस्त्यांवर अवजड कंटेनर,टेलर रस्त्यावर दोन लेन मध्ये बिंनधास पार्क करून निघून जात असून वाहतूक पोलिसासह येथील ग्रामपंचायतसहीत ग्रामस्थ पण याकडे कानाडोळा करताना पाहावयास मिळत आहे.

आज शनिवार दि.०४ ऑक्टोबर रोजी सकाळी नवघर सर्कल जवळ एका मदधुंद टेलर चालकाच्या हलगर्जीमुळे एका



टुव्हीलर चालकास जोरदारपणे धडक दिली असता टुव्हीलर चालकास गंभीर दुखापत झाली असून त्याच नजीकच्या कोप्रोली दवाखाद्यात उपचारासाठी नेहले असून टुव्हिलरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.तर सदर घटनास्थली त्वरीत उरणचे पोलिस अधिकारी तसेच वाहतूक पोलिस येऊन या झलेल्या गंभीर अपघाताची पाहणी करून वाहतुकीस अडथळा निर्मान होऊ नये म्हणून वाहतूक सुरळीत करून देऊन सदर अपघात ग्रस्त व्यक्तीस तसेच त्याच्या झालेल्या टुव्हिलरचे नुकसान भरपाई देण्याचे टेलर मालकाने कबूल करून दिले आहे.

यावेळी येथील नवघर,नवघरपाडातील ग्रामस्थांचा रुद्राआवतार पाहावयास मिळत होता कारण नवघर सर्कल पासून ते खोपटा ब्रिज तसेच कुंडेगाव आणि पागोटे कडे जाणा-या रस्त्यांवर दोन्ही बाजूस पार्कींग करण्यात आलेले टेलर,कंटेनरवर लवकरात लवकर ठोस निर्णय घेऊन योग्यती कारवाई करावी अशी येथील ग्रामस्थांनी येथे आलेल्या पोलिस अधिका-यांकडे केली.यावेळी नवघर,नवघर पाड्यातील ग्रामस्थासहीत आजूबाजूचे नागरिक मोठ्या संख्येने जमा झाले होते.आता बघू या घटने नंतर तरी प्रशासनाला तसेच येथील स्वयंभू पुढा-यां सहित ग्रामपंचायतीसह ग्रामस्थांना जाग येतोय का ??

# एस. एम.सी. च्या शारदा महोत्सवात सांस्कृतिक आणि देशभक्तीपर घटकांचा मिलाफ होता- ठाणेदार श्रीदेवी पाटील.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

**वाशिम :** नवरात्रीनिमित्त, एसएमसी इंग्लिश स्कूलमध्ये शाळेने भव्य शारदा उत्सव आयोजित केला होता, जो सांस्कृतिक आणि देशभक्तीपर कार्यक्रमाचा आणि अनोखा मिलाफ होता.

महोत्सव आदरणीय शारदा देवीची मूर्ती स्थापित करण्यात आली आणि विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. हरिभाऊ श्री सागर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राचार्य मीना उबगडे यांच्या सक्षम मध्ये खेरदी खाली शारदा महोत्सव साजरा करण्यात आला.

उत्सवाच्या पहिल्या दिवशी शारदा देवीची मोठी स्थापित करण्यात आली . हे शुभ कार्य संस्थेचे सचिव पुरुषोत्तम शर्मा यांनी केले.

वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ठाणेदार श्रीदेवी पाटील यांनी विशेष पाहुणे म्हणून कार्यक्रमाचे शोभा वाढवली. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी चमक दाखवली या तीन दिवसाच्या महोत्सवात विद्यार्थिनी त्यांच्या प्रतिभेचे उत्तम प्रदर्शन केले.

मुलांनी शास्त्रीय नृत्य, शारदा स्तवन, दांडिया, नवदुर्गा माहिती आणि नवदुर्गाचे विविध रूपे सारख्या मनमोहक सादरीकरण विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

एकल नृत्य सादरीकरणाने ही



प्रेक्षकांचे मनोरंजन केले. महोत्सवा दरम्यान, शिक्षकांसाठी खेळाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे कार्यक्रमात नवीन ऊर्जा आणि उत्साहाने निर्माण झाला.

शिक्षक आणि उत्साहाने आणि पूर्णपणे सहभाग घेतला यावर्षीच्या शारदा उत्सवाचे एक आकर्षण म्हणजे 'ऑपरेशन सिंदूर' चे भावनिक सादरीकरण विद्यार्थिनी काश्मीर आणि पाकिस्तानी हल्ल्याच्या क्षेत्राचे चित्रण करणारा देखावा सादर केला.

शिवाय पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन द्वारे ऑपरेशन सिंदूर ची विस्तृत माहिती देण्यात आली. सोफिया कुरुशी आणि भूमिका सिंग यासाठी व वाहन महिलांनी भूमिका साकारत भारतीय सैन्याच्या शौर्य आणि बलिदानाला आदरांजली वाहिली. सादरीकरण देशभक्तीच्या भावनांनी उत्कृष्ट होते आणि संपूर्ण प्रेक्षकांना भावून गेले. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा सोबतच राष्ट्रीय अभिमानाला प्रोत्साहन देण्याचे हे महोत्सव उत्कृष्ट उदाहरण ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका प्रणिता हरसूले, संजय बोदडे, पवन खंडेलवाल, संजय दळवी, अभिजीत जोशी, भारती मारशेटवार, रश्मी मोहटे यांनी परिश्रम घेतले.

# भाजपा किसान मोर्चा जिल्हा कार्यकारणी बुलढाणा, जाहीर

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

बुलढाणा भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा जिल्हा कार्यकारणी चिखली विधानसभा मतदारसंघाचे आमदार आदरणीय श्वेता ताई महाले पाटील यांच्या आदेशावरून भाजपा जिल्हाध्यक्ष बुलढाणा माजी आमदार विजयराज शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष चक्रधरजी लांडे यांनी आज भाजपा किसान मोर्चा बुलढाणा जिल्हा कार्यकारणी घोषित केली आहे.

जिल्हा कार्यकारणी मध्ये खालील प्रमाणे पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून त्यांना पक्ष वाढीसाठी बळकटी मिळो शेतकऱ्याप्रती असता भाजप पक्ष वाढीसाठी काम करण्यासाठी शुभेच्छा जिल्हाध्यक्ष चक्रधर जी लांडे साहेब यांनी दिलेल्या आहेत.सरचिटणीस राम जाधव अमडापूर,प्रभाकर कायंदे,नागझरी,मारोतराव सुरवसे सुलतानपूर,समाधान मुरकुटे सावळी यांची जिल्हा सरचिटणीस पदावर नियुक्ती करण्यात आली असून.उपाध्यक्ष शंकरराव



तरमळे,विष्णू पाटील उगले,श्रीकृष्ण इंगळे,भागवत तायडे,उद्धवराव पवार,रूपराव सावळे,विश्वंभर हळदे, महादेवराव शिराळ,भानुदास किनोळकर,समाधान बोडके, राजूभाऊ इंगोले,संतोष देशमुख, सखाराम कुलकर्णी सखाराम कुलकर्णी,शशिकांत देशमुख रायरी,भगवानजी नागरे विठ्ठलराव गवते. सचिव बाळू पाटील,गजानन पांडुरंग सांबारे,सीताराम गाळे,निलेश तेजराव धंदर,सुनील भुजंगराव रिंडे,भगवान एकडे,गजानन रसाळ,पांडुरंग बळीराम दांदडे, नितीन पाटील,तेजराव नितीन पाटलांनी नंतर नागेश नारायण राजबिंडे,तेजराव रामदास घायाळ,मुरलीधर किसन वाघमारे,दीपक पडोळकर, लोकेश डोणगावकर,उमेश पवार, प्रकाश राठोड,मोहम्मद जावेद अब्दुल सत्तार.कोषध्यक्ष राजूभाऊ पाखरे घाटबोरी,महिलाआघाडी,भाजपा किसानमोर्चा,जिल्हाध्यक्ष सुनिता ताई आंधळे FPO प्रमुख (शेतकरी उत्पादक कंपनी) जिल्हा संयोजक वसंता मुळे सहसचिव महादेव ठाकरे, रामेश्वर वाकडे,बबनराव सुरडकर,संतोष सुभाष वारे, सोपान गोविंदा व्यवहारे,योगेश विश्वासराव आढाव धनंजय निवृत्ती जाधव,सखाराम मिरकर, अनंतराव खेकाळे,गणेश किसन पालवे,बबनराव इंगळे,

शोषल मीडिया प्रमुख गणेश तांगडे,रमेश सोळंकी, शिवाजी भास्कर कायंदे,प्रसिद्धी प्रमुख उद्धवराव आटोळे,रंगनाथ सावळे वरील सर्व पदाधिकारी यांचे जिल्हा कार्यकारणी मध्ये निवड झालेली आहे.भाजपा किसान मोर्चा,सर्व मंडळ तालुका अध्यक्ष डिगांबर शामराव जाधव पाटील,चिखली नारायण धुमाळ, अमडापूर मंडळ गणेश साखरे, धाड मंडळ अमोल पडोळ, बुलढाणा तालुका विश्वास नामदेवराव मापारी मोताळा मंडळ गजानन गजानन बडे धामणगाव बडे मंडळ, दत्तात्रय मवाळ मेहेकर मंडळ गजानन वरकड लोणार मंडळ गणेश शेळके देऊळगाव राजा मंडळ सुनील काळुसे साखरखेर्डा मंडळ एडवोकेट प्रशांत देशमुख चिखली शहर अध्यक्ष. धारेश्वर आप्पा देशमुख अमडापूर शहराध्यक्ष, वरील सर्व पदाधिकारी यांचे जिल्हा कार्यकारणी व मंडळ अध्यक्ष तथा शहर मंडळ अध्यक्ष विविध पदावर नियुक्ती केलेले असून या सर्व पद नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन व पुढील राजकीय वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

## रयत शिक्षण संस्थेचे १०६ वर्धापन दिन जासई हायस्कूलमध्ये साजरा करण्यात आले

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

१०६ वर्षांपूर्वी शिक्षण महर्षी डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज त्या संस्थेला १०६ वर्ष पूर्ण झाले त्यानिमित्त रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनियर कॉलेज जासई या विद्यालयाच्या प्रांगणात रयत शिक्षण संस्थेचे वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम शाळेच्या कर्तव्यदक्ष मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम यांनी कर्मवीरांना व रयत माऊली यांच्या प्रतिमेचे पूजन केले तसेच शाळेचे उपमुख्याध्यापक श्री कुटे सर पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम आणि सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील प्रतिमांचे पूजन केले.

कर्मवीरांना विषयी माहिती सांगण्यासाठी विद्यालयातील इयत्ता सातवी ब ची विद्यार्थिनी आरती गलांडे, सातवीची विद्यार्थिनी वैष्णवी राजगे, आठवी अ ची विद्यार्थिनी सानवी घरत, यांनी रयत शिक्षण संस्थेची व कर्मवीरांची महती





मुलांना सांगितली. तसेच अध्यक्षीय भाषणात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे मॅडम यांनी मुलांना कर्मवीरांना यांनी प्रतिकूल परिस्थिती त्यावेळी तळागाळातील लोकांना शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यांपर्यंत खेड्यापाड्यातील झोपडी झोपडी पर्यंत व झोपडी झोपडीतील माणसांपर्यंत कशी वाहून नेली याविषयी माहिती सांगितली. पूर्वीच्या काळी जातीभेद कसा होता आणि त्यावेळची परिस्थिती याविषयी माहिती सांगितली, तसेच अशा परिस्थितीत देखील कर्मवीरांनी सर्वांना शिक्षण मिळण्यासाठी कोणते प्रयत्न केले ,याविषयी सर्व माहिती अध्यक्ष भाषणात दिली कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेच्या पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या उपशिक्षिका सौ वर्तक डी आर मॅडम यांनी केले.

## सुनिल संदीपान चौदंते यांना अनुकंपा तत्वावर पाठबंधारे विभाग, मुदखेड येथे नियुक्ती – नागरिकांत आनंदाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड (प्रतिनिधी): योगेश चौदंते**

सुनिल संदीपान चौदंते यांना अनुकंपा तत्वावर पाठबंधारे विभाग, मुदखेड येथे नियुक्ती मिळाल्याची आनंदवार्ता समजताच मुदखेड व परिसरात सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सुनिल चौदंते हे आपल्या शिक्षणाचं व सर्व गुण संपन्न आणि कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्व सामाजिक श्रेत्रात नेहमी अग्रेसर म्हणून ओळखले जातात. त्यांनी जबाबदारीने या नियुक्तीमुळे चौदंते कुटुंबासह सर्व नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांमध्ये आनंदाची लहर उसळली आहे.



या निमित्ताने मुदखेड शहरात आयोजित अभिनंदन समारंभात पत्रकार प्रकाश गवारे, शरद निखाते, गंगाधर निखाते, संदेश चौदंते, सोनू जाधव, राजकुमार कदम, पत्रकार अजय कांबळे, सोनू हिरे, पत्रकार योगेश चौदंते, राजु कांबळे तसेच अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी सुनिल चौदंते यांच्या यशाचे कौतुक केले. त्यांनी म्हटले की – "अनुकंपा तत्वावर मिळालेली ही नियुक्ती ही केवळ नोकरी नाही, तर ती कुटुंबाच्या कष्टांना मिळालेली योग्य दाद आहे.

सुनिल चौदंते यांच्यासारखे जबाबदार तरुण समाजासाठी प्रेरणादायी आहेत."

संपूर्ण मुदखेड परिसरात चौदंते यांच्या नियुक्तीबद्दल आनंदाचे वातावरण असून सर्वत्र "सुनिल चौदंते यांना हार्दिक अभिनंदन व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा!" अशा शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## उरण मधील चिरनेर परिसराला ठाणे विभागीय सहसंचालक शिवाजी आमले यांची शेतभेट

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण तालुक्यात ठाणे विभागीय सहसंचालक शिवाजी आमले यांनी तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, पोलीसपाटील संजय पाटील, कृषी पर्यवेक्षक शुभम गटकळ, मंडळ अधिकारी शिवाजी लोहकरे, कृषी सहाय्यक सुषमा गायकवाड, कृषी सहाय्यक सुरज घरत या सर्वांच्या उपस्थितीत उरण तालुक्यातील गावांना अलीकडे भेट देऊन, शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिकांची पाहणी करून घेतली.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण तृणधान्य



अभियानांतर्गत चारसुत्री पद्धतीने घेतलेल्या रत्नागिरी आठ या भात लागवड प्रात्यक्षिकाची पाहणी केली. दरम्यान मौजे चिरनेर येथे पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत स्थापन झालेल्या श्री महागणपती सेंद्रिय शेतकरी उत्पादक गटातील शेतकऱ्यांची भेट घेऊन त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून या गटातील शेतकऱ्यांनी तयार केलेल्या सेंद्रिय निविष्ठांची तसेच सेंद्रिय निविष्ठांचा वापर केलेल्या पिकांची प्रात्यक्षिके पाहिली. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी घेतलेल्या विविध पिकांविषयी माहिती व नवीन कृषी समृद्धी योजनांची माहिती तसेच अपुरे भांडवल व तंत्रज्ञान, कौशल्याचा अभाव, बाजारपेठेची मर्यादा, रोजगाराची निर्मिती व सामूहिक विकास याविषयी देखील त्यांनी मार्गदर्शन केले. पिकांची फेरपालट व हिरवळीच्या खतांचा वापर यातून मातीचे आरोग्य निरोगी ठेवावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## लायन्स सागर चौकर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर**

उरण तालुक्यातील लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरीचे सदस्य लायन्स सागर चौकर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त दिनांक ०२/१०/२०२५ रोजी लायन्स क्लब ऑफ द्रोणगिरीच्या मदतीने गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय पिशव्या (बॅगा) वाटप करून समाजसेवेचा सुंदर उपक्रम राबविला. लायन क्लब ऑफ द्रोणागिरी तसेच लिओ क्लब ऑफ द्रोणगिरी गेले ३ वर्ष उरण मध्ये सातत्याने समाजकार्य करत आहे.

लायन क्लब चा इतिहास तुम्ही बघितला असाल तर इंटरनॅशनल पातळी वर त्यांचं खूप मोठ नाव आहे.लायन मेम्बर्स् च्या मदतीने वेगवेगळे ॲक्टिव्हिटी दिवसेन दिवस होत असतात. एज्युकेशन, अन्न दान, मेडिकल कँप, सिड बॉल , झाडे लावणे, बीच क्लीन करणे, कॉलेज साठी सेमिनार अशा विविध प्रकारच्या ॲक्टिव्हिटी होतच असतात.

समाजासाठी एक हाथ भार लावण्यासाठी क्लब मधील मुल आज सातत्याने काम करत आहेत. आणि पुढे ही गोर गरिबांसाठी लोकांसाठी काम करत राहतील असा हा क्लब नेहमी सर्वांसाठी मदत करत राहील या कार्यक्रमास लायन भुमिका सिंह (अध्यक्ष, लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी), लायन



मोनिका चौकर (सचिव), माजी अध्यक्ष लायन सीमा घरत, एम जे एफ लायन डॉ .मिलिंद पाटील (लायन्स क्लब ऑफ उलवे जेम्स), लिओ लायन राहुल भोईर (अध्यक्ष, लिओ क्लब ऑफ द्रोणागिरी), लायन नम्रता पूंनकर, लायन शिरीष म्हात्रे,लीओ सेजल ब्राम्हणे व लीओ युवराज चव्हाण उपस्थित होते.यावेळी या उपक्रमाद्वारे लायन्स सागर चौकर यांनी समाजात शिक्षणप्रेम व मदतीचा संदेश दिला.

## गुगुळ पिंपरी येथे भव्य दसरा यात्रा महोत्सव



**दैनंदिन युवक आधार**
**प्रतिनिधी गुगुळ पिंपरी हिंगोली**
**प्रशांत टाकसाळ**

सेनगाव तालुक्यातील गुगुळ पिंपरी येथे भव्य दसरा यात्रा महोत्सव निमित्ताने विविध कार्यक्रमाचे करण्यात आले आहे सहा देवाच्या पावन कृपेने दरवर्षी येथे दसरा महोत्सव व हरी कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो यावर्षी देखील हा कार्यक्रम होणार आहे दोन ऑक्टोंबर गुरुवारी गणपती महाराज व हनुमान हनुमानजी मिरवणूक रात्री नऊ वाजता निघणार आहे तीन ऑक्टोबर शुक्रवारी गणपती, महादेव, श्रीकृष्ण, मारुती, गरुड, भवानी माता या सहा देवाची रात्री नऊ वाजता मिरवणूक निघणार आहे चार ऑक्टोंबर शनिवारी लळीताथा कार्यक्रम सोगा ढोंगाचा कार्यक्रम भजन भारुड दुपारी चार वाजता ह. भ.प.दाताडा भजनी मंडळा कार्यक्रम दुपारी चार वाजता. पाच ऑक्टोबर रविवारी ह.भ.प. श्री. बाळकृष्ण महाराज येलदरी रात्री नऊ वाजता होणार आहे. सहा ऑक्टोबर ह. भ. प. सोपान महाराज मुंडे शास्त्री भागवताचार्य आळंदी देवाची यांचे रात्री नऊ वाजता किर्तन होणार आहे. सात ऑक्टोबर मंगळवारी ह. भ. प. माऊली महाराज भिमटे रावणेकर आळंदी देवाची यांचे सकाळी दहा ते बारा काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर दुपारी एक वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, त्यादरम्यान रोज सकाळी व संध्याकाळी सहा देवाची आरती सकाळी ७:३० व संध्याकाळी ८ वाजता होणार आहे या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आव्हान दसरा महोत्सव समिती , मारुती विश्वरत्न मंडळ व गावकरी मंडळी यांनी केले आहे. दरम्यान येथील कार्यक्रमात मृदंगाचार्य ह. भ.प. आदिनाथ महाराज आळंदी देवीची व ह. भ. प. मंगेश महाराज जाधव गोरेगावकर आणि भजनी मंडळ येवती, भगवती, सावरगाव, गोरेगाव, जुमडा, कडोळी, वाघोली, जुमडा, हिवरा, माहेरखेडा, गारखेडा, आसेगाव, कोयाळी खु, कोयाळी बु, येथील भजनी मंडळी सहभागी होणार आहे

## दु:खद निधन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

म्हसरूळ (नाशिक) येथील कै. विजय दत्तात्रय कुलकर्णी (वय ६९ वर्षे) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने कुलकर्णी कुटुंबिय तसेच मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे.

स्वभावाने मनमिळावू व मदतीस तत्पर असलेल्या विजय कुलकर्णी यांच्या निधनाने समाजातील एक प्रेमळ व्यक्तिमत्त्व हरपले आहे.



त्यांच्या पश्चात पत्नी लता विजय कुलकर्णी, मुलगा मंदार विजय कुलकर्णी, सुन माधुरी मंदार कुलकर्णी, मुलगी रोहिणी राहुल कुलकर्णी नातवंडे व आप्तेष्ट असा परिवार आहे.ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

## पनवेलमध्ये संविधान संवाद यात्रा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

कामगार नेते श्याम म्हात्रे यांच्या जयंतीनिमित्त, दिनांक ७ ऑक्टोबर २०२५, बुधवारी, पनवेल येथे 'संविधान संवाद यात्रा' आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून संविधान संवाद यात्रा सुरू होऊन संविधानाच्या मूल्यांना व तत्त्वांना सर्वसमावेशक पद्धतीने पोहोचवण्याचा हा महत्त्वाचा उपक्रम असेल. पनवेलमधील सर्व संविधानप्रेमी नागरिक, संस्था आणि संघटनांनी या यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रुती म्हात्रे यांनी केले आहे.तसेच त्याच दिवशी,सकाळी ११ :३० वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सांस्कृतिक कार्यक्रम येणार आहेत. या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मा. हर्षवर्धन सपकाळ, ओबीसी कमिटीचे अध्यक्ष भानूदास माळी, लोकशाहीर संभाजी भगत, मा. शिक्षक आमदार कपिल पाटील आणि डॉ. श्रीरंजन आवटे या सर्व मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.याशिवाय, शितल भंडारे यांच्या 'प्रबोधन कल मंच' तर्फे एक विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम संविधानिक जागरूकता आणि सामाजिक प्रबोधनाला कलात्मक सादरीकरणाद्वारे स्पष्ट करणारा ठरेल.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# स्वर्गीय ॲड. आप्पासाहेब उगावकर यांना निफाडमध्ये श्रद्धांजली

## सहकार, शिक्षण, सामाजिक, विधी क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तिमत्वाला भावपूर्ण आदरांजली

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :** ज्येष्ठ विधीज्ञ, समाजकारणी आणि सहकार चळवळीतील आदर्श कार्यकर्ते स्वर्गीय ॲड. आप्पासाहेब उगावकर यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी निफाड येथील वैनतेय विद्यालयात शोकसभा संपन्न झाली. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आप्पासाहेबांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.




**फोटो: स्वर्गीय ॲड. आप्पासाहेब उगावकर यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आयोजित शोकसभेत बोलताना वि. दा. व्यवहारे.**

या प्रसंगी राष्ट्रसेवा दलाचे राज्याध्यक्ष अर्जुन कोकाटे म्हणाले, "चांगला विचार पुढे नेणारा कार्यकर्ता असेल तर त्याला योग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य आप्पासाहेबांनी केले. सहकार, शिक्षण, सामाजिक, विधी आणि सिंचन या सर्व क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले."

न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे यांनी सांगितले, "आप्पासाहेबांनी आपल्या तत्त्वांशी बांधिलकी ठेवत सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत ते आग्रही होते. त्यांच्या जाण्याने सामाजिक चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे."

ॲड. आण्णासाहेब भोसले यांनी आप्पासाहेबांना "कायद्याचे ज्ञानपीठ" संबोधले. त्यांनी अनेक ज्युनिअर वकिलांना मार्गदर्शन करून घडविण्याचे काम केले, असे त्यांनी नमूद केले.

राजेंद्र डोखळे यांनी म्हटले, "आप्पासाहेबांनी समाजासाठी आणि शेतकऱ्यांसाठी समर्पित भावनेने कार्य केले."या शोकसभेस वि. दा. व्यवहारे, अर्जुन कोकाटे, राजेंद्र डोखळे, निफाडचे उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, रतन पाटील वडघुले, ॲड. आण्णासाहेब भोसले, राजेंद्र मोगल, शिवाजी ढेपले, मधुकर शेलार, संपत डुंबरे, नंदलाल बाफना, अपर्णा उगावकर, रशीद पठाण आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सणसर ग्रामपंचायत हद्दीत स्मार्ट मीटर बसवण्यात येऊ नये म्हणून सरपंच यशवंत पाटील यांचा तीव्र विरोध

## एम एस ई बी सणसर कार्यालयास ग्रामपंचायतमार्फत पत्र

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेली सणसर गावात सध्या स्मार्ट मीटर बसवण्याचे काम चालू असून याबाबत सणसर उपअभियंता महावितरण विद्युत कंपनीने सणसर ग्रामस्थ व सणसर ग्रामपंचायत यांना कोणतीही पूर्वसूचना दिली नसताना सणसर ग्रामपंचायत हद्दीमध्ये नविन स्मार्ट मिटर बसविणेस सुरवात केली असल्याची माहिती ग्रामस्थ यांनी सरपंच यशवंत पाटील यांना सांगून त्यांच्या निदर्शनास आणुन देण्यात आली यावर सरपंच यशवंत पाटील यांनी स्मार्ट मीटर परिसरात बसवण्यात येत असल्याबाबतचा विषय मासिक मिटिंला घेऊन सणसर ग्रामपंचायत हद्दीत कोणत्याही परिस्थितीत स्मार्ट मीटर बसवण्यात येऊ नये म्हणून सणसर उपविभाग महावितरण यांना सरपंच यशवंत पाटील यांनी ग्रामपंचायती मार्फत पत्र देण्यात आले



मौजे सणसर ग्रामपंचायत हद्दीमध्ये आपणा मार्फत वीज ग्राहकांना नविन स्मार्ट मिटर बसविण्याचे ग्रामस्थांच्या तक्रारी आल्या असल्याने सदरील नविन मीटर बसविणे तात्काळ थांबविण्यात यावे व बसविलेले मीटर आपण तात्काळ बदलुन द्यावेत अशी सरपंच यशवंत पाटील उपसरपंच सर्व सदस्य सणसर ग्रामपंचायत व सर्व ग्रामस्थांच्या वतीने विनंती करत करण्यात आली असून तरी सणसर ग्रामपंचायत हद्दीमध्ये नविन स्मार्ट मिटर बसविणेस सर्व ग्रामस्थांचा विरोध आहे.तरी ग्रामपंचायत हद्दीमध्ये मीटर बसवविण्यात येवू नये अश्या प्रकारचे पत्र ग्रामपंचायतीमार्फत सणसर महावितरण कार्यालयास देण्यात आले असून याबाबत सरपंच यशवंत पाटील आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितलं की स्मार्ट मीटर बसवणे महावितरणने बंद केले नाही तर तीव्र आंदोलन केल जाणार आहे.

# सेलू तालुक्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव व पथसंचलन उत्साहात पार पडला



**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सेलू तालुक्याच्या वतीने विजयादशमी उत्सव व पथसंचलनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला स्वयंसेवक, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. सचिन कोळशेकर (देवनी प्रांत कार्यालय प्रमुख) होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. नितीन लिंपणे (लिंपणे हॉस्पिटल, सेलू) यांनी उपस्थिती लावली.

या प्रसंगी वक्त्यांनी हिंदू समाजातील एकता, शिस्त, व राष्ट्रनिर्माणासाठी स्वयंसेवकांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. विजयादशमी हा संघाचा स्थापनेचा दिवस असल्याने, या दिवशी देशभरात शाखांमध्ये विशेष उत्सव साजरा केला जातो.

पथसंचलनाची सुरुवात सकाळी 11 वाजता झाली, तर मुख्य उत्सवाची बैठक दुपारी 01वाजता घेण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन विकास नारायणराव पिंगळे (सेलू तालुका कार्यवाह) यांनी केले होते.

उत्सवस्थळ श्रीकायावार बाबासाहेब मंदिर, सेलू येथे होता.

संपूर्ण कार्यक्रमात स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पथसंचलन करून राष्ट्रगीत व संघगीताच्या ध्वनीने परिसर दुमदुमला.

# युवकांची भुमिका ठरवणार घाटंजीचा नगराध्यक्ष कोण होणार युवकांच्या भुमिकेवर लागल्या सगळ्यांच्या नजरा?

**दैनिक युवक आधार -**

**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर लवकरच न.प.निवडणूक लागणार याचे स्पष्ट संकेत मिळाले आहे त्यामुळे घाटंजी शहरात याची सर्वच पक्ष आघाडी जोरदार मोर्चे बांधनी करत आहे असे असतांना घाटंजी शहरातील जनता मात्र यावेळी मोठ्या प्रमाणात पक्ष न बघता रात्रन दिवस धडपड करणाऱ्या युवकांना संधी देण्याच्या बेतात दिसत आहे सर्वत्र याची चर्चा सुरु आहे नवरात्र आटोपली असल्याने आता निवडणूकीची खरी रंगत दिसनार आहे.

युवकांमधून निखिल देठे,सुरज हेमके,मनोज हामंद,सारंग कहाळे,संघपाल कांबळे तसेच शुभम उदार यासारख्या युवकांच्या भुमिकेवरच घाटंजीकरांच्या नजरा लागल्या आहे कारण हे सर्वांनी शहरात आपआपल्या सामाजिक कार्यामूळे ओळख निर्माण केली आहे निखिल देठे छत्रपती महोत्सव समितीच्या माध्यमातून युवकांची मोठी फळी निर्माण केली आहे त्यामाध्यमातून अणेक सामाजिक कार्य ते करत असल्याने त्यांची भुमिका अंत्यत महत्वपूर्ण ठरणार असल्याचे बोलले जात आहे तसेच जिव्हाळ्याची भिंत या माध्यमातून रोज शेकडो अनाथ,वृद्ध,गरिब लोकांना अन्नदान अविरत करत असलेले सुरज हेमके यांची भुमिकाही निवडणुकित महत्वपूर्ण ठरणार आहे, २०१६ ची नगर सेवक निवडणूक अंत्यत काठावर हरलेले संघाच्या कुशीत तयार झालेले तसेच भाजपाचा एकनिष्ठ कार्यकर्ता दिवस रात्र रुग्णांच्या मदतीकरिता तत्पर असलेले परंतू भाजपाच्या अंतर्गत राजकारणामूळे सध्या शहर भाजपावर काहिसे नाराज असलेले मनोज हामंद यांची भुमिकाही नगराध्यक्ष कोण होणार याकरिता महत्वपूर्ण ठरणार आहे ते स्वतःही यावेळी नगरसेवकाची निवडणूक लढणार असे स्पष्ट केले आहे. माहीतीच्या अधिकाराचा वापर करत अणेक गोष्टिंना वाचा फोडणारे सारंग कहाळे यांचाही बर्याच भागात चांगला प्रभाव दिसून येत आहे त्यामुळे यांचीही भुमिका महत्वाची असणार आहे तसेच ते स्वतःही निवडणुक लढवणार हे निश्चित आहे तसेच वंचित बहूजन आघाडीच्या माध्यमातून शहरात अणेक आंदोलन उभारणारे संघपाल कांबळे यांनीही निवडणूक लढवावी अशी अणेकांची मागणी आहे यामूळे वेळेवर यांचीही भुमिका महत्वाची ठरणार शहरातील घाटी हा परिसर घाटी घाटंजी विदर्भ विकास आघाडिचे संस्थापक शैलेश ठाकूर यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो याच भागात त्यांचा शिष्य शुभम उदार सक्रिय असून अणेक युवकांना एकत्रीत ठेवण्याचे कार्य केले आहे यामुळे याचीही भुमिका अंत्यत महत्वपूर्ण असणार आहे.

एकंदरीत या सर्व युवकांने केलेल्या कार्यामूळे संपूर्ण शहरात यांची चर्चा होतांना दिसत आहे यामूळे या सर्व युवकांची भुमिकाच घाटंजीचा नगराध्यक्ष ठरवणार? असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

# टेंभुर्णीत जि.प. निवडणूकीचे बिगुल वाजण्याची इच्छुकांनी प्रतीक्षा

**दैनिक युवक आधार**

**(जाफराबाद)टेंभुर्णी प्रतिनिधी अनिल ससाने**

जाफराबाद तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक दीड महिन्यावर होऊ घातल्याने भावी उमेदवाराच्या भेटीगाठी वाढल्या आहेत टेंभुर्णी जिल्हा परिषद सर्कल यावेळी महिला राखीव राहण्याची शक्यता आहे टेंभुर्णी सर्कलमध्ये इच्छुकांचे फलक गावो गावी दिसत आहे भारतीय जनता



पक्षाच्या वतीने पाचही जागेवर सक्षम उमेदवार उभे करून जिल्हा परिषद अध्यक्ष पद ताब्यात घेण्यासाठी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी कंबर कसली आहे यामुळे सर्वांना प्रतिष्ठेचा समजला जाणारा टेंभुर्णी जिल्हा परिषद गटातून मोठी चुरशीची निवडणूक होईल अशी चर्चा सुरू आहे टेंभुर्णी जिल्हा परिषद गटातील टेंभुर्णी या गण मध्ये बारा हजाराच्या पुढे मतदार संख्या असल्याने टेंभुर्णी गणातून पुष्पाताई शालिकराव मस्के ,दीपक जमदाडे ,गणेश धनवई ,संतोष पाचे ,व काळेगाव गणातून ज्ञानेश्वर गुलाबराव पवार ,हे त्यांची तयारी दर्शवीत आहे रॉका काँग्रेसच्या व उबाठा शिवसेना यांच्याकडून जनार्धन झोरे जिजाबाई कळंबे स्वाती मस्के यांच्यासहअदी जन तयारी ठेवत आहे

या सर्कलमध्ये या गावाचा समावेश आहे टेंभुर्णी पापळ भातोडी काळेगाव खानापूर काचनेरा वरखेडा नांदखेडा शिराळा डोलखेडा किन्ही वोढाणा तांडा इत्यादी गावाचा समावेश आहे

# वंचित बहुजन आघाडी वाशिम जिल्ह्याची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**वाशिम :** आज दिनांक 4 ऑक्टोबर 2025 रोजी स्थानिक शासकीय विश्रामगृह येथे जिल्हा कार्यकरणी विस्तार करण्याकरिता महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली.या बैठकीला प्रमुख पाहुणे माजी आमदार तथा नतिकोद्दीन खतीब साहेब व फुले आंबेडकर विद्वत सभेचे मुख्य समन्वयक प्राध्यापक भास्कर भोजने सर हे होते.या सभेचे अध्यक्ष म्हणून नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष दत्तराव गोटे हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून नवनियुक्त जिल्हा महासचिव प्राध्यापक रंगनाथ धांडे,महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ज्योतीताई इंगळे,विधानसभा प्रमुख अभिजित राठोड,माजी जिल्हाध्यक्ष डॉ.गजानन हुले, माजी जिल्हा महासचिव सोनाजी इंगळे त्यांची उपस्थिती होती.या सभेचे सूत्रसंचालन महेश तिडके यांनी केले,प्रास्ताविक प्रा.रंगनाथ धांडे यांनी केले,तर आभार प्रदर्शन सोनाजी इंगळे यांनी केले.वाशिम जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष दत्तराव गोटे आणि जिल्हा महासचिव प्राध्यापक रंगनाथ धांडे यांचा सत्कार जिल्ह्याचे माजी महासचिव सोनाजी इंगळे यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.माजी जिल्हा कमिटीच्या वतीने रिसोड तालुका अध्यक्ष महेश तिडके,वाशिम तालुका अध्यक्ष दिलीप भगत, मंगरुळपीर तालुका अध्यक्ष नरेंद्र राऊत यांचा सत्कार करण्यात आला.या सभेला वाशिम जिल्हा निरीक्षक माननीय खतीब साहेब, भास्कर भोजने सर,अभिजीत राठोड,ज्योतीताई इंगळे, डॉक्टर गजानन हुले यांनी मार्गदर्शन केले,प्राध्यापक भोजने सर यांनी जिल्ह्यामध्ये नव्याने स्थापन होणारी जिल्हा कमिटी ही समा सर्वसमावेशक असली पाहिजे. आणि येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये मागील निवडणुकीपेक्षा तिपटीने जिल्हापरिषद सदस्य संख्या वाढली पाहिजे.म्हणजेच मागील वेळेस वंचित बहुजन



आघाडीचे आठ अधिक पुरस्कृत एक असे नऊ जिल्हा परिषद सदस्य निवडून आले होते.वाशिम जिल्हा परिषदेमध्ये कमीत कमी 30 जिल्हा परिषद सदस्य निवडून आणण्याचा संकल्प प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी करावा असे आवाहन केले. जिल्हा निरीक्षक खतीब साहेब यांनी सर्व समाजाचे व मुस्लिमांची संख्या ताकतीने वाढविण्याच्या सूचना सूचना जिल्हा पदाधिकाऱ्यांना दिल्या. मागील नगरपरिषद निवडणुकीमध्ये कारंजा मंगरूळपीर या दोन नगरपरिषद अध्यक्ष व सत्ता ही वंचित बहुजन आघाडीकडे होती.तर वाशिम रिसोड या या दोन नगरपरिषद मध्ये आपण थोड्या मतांनी पराभूत झालो.परंतु येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये वाशिम रिसोड मंगरूळपीर आणि कारंजा या चारही नगरपरिषद मध्ये वंचित बहुजन आघाडीचे नगराध्यक्ष निवडून आले पाहिजे यासाठी प्रयत्न करावा असे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात जिल्हाध्यक्ष दत्तराव गोटे यांनी सर्वप्रथम श्रद्धे बाळासाहेब यांचे आभार मानले आणि माझ्यावर जी जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली त्या जबाबदारीला इमानेइतबारे यशस्वी करून येणाऱ्या काळामध्ये वंचित बहुजन आघाडीला जिल्ह्यामध्ये ताकतीने उभी करून पक्ष संघटन मजबूत करण्याचा 100% प्रयत्न करिन.आणि भविष्यातील प्रत्येक निवडणुकीत भरघोष यश संपादन करण्याचा संकल्प करतो अशी शास्वती दिली.अशाप्रकारे अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये सदर सभा संपन्न झाली.या सभेला संदीप सावळे, गिरधर शेजूळ,सरनाथ अवचार, विनोद भगत,समाधान भगत, बाळासाहेब खंडारे,भारत भगत,सारनाथ अवचार,नरेंद्र राऊत अमोल पखाले,राजाभाऊ चव्हाण,शंकर तायडे,विनोद भगत,गुणवंत गहूले,पांडुरंग पाटील,विलास गहूले,सुनिल गायकवाड,संदिप सावळे,बाळासाहेब खंडारे,वसंतराव राठोड,रामदास वानखडे,अमोल गहूले,रामेश्वर गहूले,नारायण मिटकरी,भास्कर गायकवाड,नांदकर,उतम झगडे,सुभाष देवडे,सुरेश सोनोने,सुनिता खाडे,प्रा.मुकुंद खडसे,गजानन गहूले,प्रवीण राऊत,राजू दारोकार,अंत्योदय चोथमल,निलेश भोजने,फिरोज खान,संतोष गहूले,कैलास मिटकरी,सुखदेव काजळे,पी. एस.खंदारे,फिरोज पठाण,अब्बास पठाण,चेतन अंभोरे,मोहन कांबळे यांचेसह जिल्हाभरातून शेकडो आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्व.ॲड.आप्पासाहेब सरनाईक यांची जयंती उत्साहात साजरी......!

**रिसोड (प्रतिनिधी)**

**रणजितसिह. ठाकुर**

श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे स्वर्गीय ॲड.आप्पासाहेब सरनाईक यांची जयंती दिनांक 5 ऑक्टोबर 2025 रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख हे होते.

सर्वप्रथम प्राचार्य संजय देशमुख यांच्या हस्ते स्वर्गीय ॲड.आप्पासाहेब सरनाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला, त्यानंतर उपस्थित सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका तथा शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी यांनी सुद्धा स्वर्गीय ॲड.आप्पासाहेब सरनाईक यांना विनम्र अभिवादन केले.

यावेळी बोलताना प्राचार्य संजय देशमुख यांनी स्व.ॲड.आप्पासाहेब सरनाईक यांच्या



जीवन कार्यावर प्रकाश टाकताना स्वर्गीय ॲड.आप्पासाहेब सरनाईक यांनी बहुजनांची मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली पाहिजे यासाठी या श्री शिवाजी शिक्षण संस्थेची 1961 मध्ये स्थापना केली त्यावेळी लावलेले हे छोटेसे रोपटे त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले असून या शिवाजी शिक्षण संस्थेची वाटचाल शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांच्या मार्गदर्शनात यशस्वीरित्या सुरू असल्याचे सांगितले. ज्या काळामध्ये शिक्षण हे आपल्या भागामध्ये काही विशिष्ट लोकांपुरते मर्यादित होते, त्या काळामध्ये शिवाजी शिक्षण संस्थेचे दालन उभारून बहुजनांची मुले शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणत असतानाच उर्दू शाळेच्या माध्यमातून मुस्लिम समाजातील मुले शिक्षणाच्या प्रवाहामध्ये कशी येतील याचाही प्रयत्न त्यावेळी स्वर्गीय ॲड.आप्पासाहेब सरनाईक यांनी केला असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक विजय देशमुख यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक,शिक्षक, शिक्षिका तथा शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रत्नाळीतील पाणीटंचाईवर शंकर अण्णा बोलमवाड यांचा दिलासादायक पुढाकार! ; स्वखर्चातून तात्काळ बोरवेल मारून केली पाण्याची सोय!

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद शहरातील रत्नाळी येथील गोदावरी रोड पाड गल्ली परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. स्थानिक नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येची माहिती मिळताच धर्माबाद तालुक्यातील प्रचलित युवा उद्योजक शंकर अण्णा बोलमवाड यांनी पुढाकार घेत नागरिकांच्या मागणीनुसार त्या ठिकाणी तात्काळ बोरवेल मारून दिली.



अण्णांच्या या तातडीच्या निर्णयामुळे त्या गल्लीतील नागरिकांना पाण्याच्या समस्येतून बोरवेलला दोन इंच पाणी लागल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. समाजातील गोरगरीब जनतेसाठी नेहमी तत्पर असलेले शंकर अण्णा बोलमवाड हे सामाजिक जाणिवेतून केलेल्या कार्यामुळे सतत चर्चेत असतात.

स्थानिक नागरिकांनी त्यांचे आभार मानत सांगितले की, "अण्णा नेहमीच लोकांच्या अडचणीला ओळखून मदतीचा हात पुढे करतात. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीमुळे आम्हाला मोठा आधार मिळाला आहे."

समाजसेवेचा आदर्श उभारणारे शंकर अण्णा बोलमवाड यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. धर्माबाद शहरासह तालुक्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# "कोकणचा साज,संगमेश्वरी बाज" लोकनाट्याचा पार्ल्यातील मा.दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात प्रयोग

## नाट्यप्रयोगाला अभिनेता महेश कापरेकर यांची लाभणार विशेष उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

बोली भाषेमधील गोडवा आगळाच असतो. प्रमाणभाषेची गरज मान्य करूनही त्याचे सतत तुणतुणे वाजवणा-यांना बोलीभाषेचा गोडवा कळत नाही. त्यातील थेट भाव आणि व्यक्तहोण्याचा रोखठोकपणा शिवाय लडिवाळपणा ही गंमत असते. 'संगमेश्वरी बोली'मध्ये हे सारे एकवटले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर ते खेड भागातील या बोलीभाषेला तसे दुय्यमच मानले जात होते. मात्र, आधी आनंद बोंद्रे यांच्या एकपात्री प्रयोगातून आणि आता 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज' या लोकनाटय़ातून ही बोली प्रवाही होते आहे. याच संगमेश्वरी बोलीतून जाकडी,नमन,भजन अशा कोकणी लोककला लोकनाटय़ाच्या फॉर्ममधून सादर करणा-या 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज' लोकनाटय़ाने अवघ्या तीन वर्षात ४५० हुन अधिक प्रयोग सादर केले आहेत. कोकणी लोककलेचा हा ख-या अर्थाने सन्मानच म्हणावा लागेल.






कोकणला मोठी सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. निसर्गसौंदर्य,आंबा, काजूसारखी फळे, अनेकविध सण, उत्सव, प्रथा यांच्यासोबत बोलीभाषा ही कोकणची वैशिष्टय़े आहेत. विशेष उल्लेख करता येईल तो ग्रामीण ढंगाच्या संगमेश्वरी बोलीचा. समर्थ कृपा प्रॉडक्शनच्या टीमने 'कोकणचा साज संगमेश्वरी बाज' या लोकनाटय़ाची निर्मिती करताना संगमेश्वरी भाषेला लोकमान्यता मिळवून देण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला आहे. तात्या गावकर हा या कथासूत्राचा तथा लोकनाटय़ाचा प्रमुख आहे. कोकणातील लोककला, संस्कृती जाणून घेऊन त्यावर 'डॉक्युमेंटरी' करण्याच्या इराद्याने येणारा मुंबैकर गावातील इरसाल पात्रांना कसा सामोरा जातो, हे पाहणे खूपच मजेशीर आहे. विविधरंगी पात्रांच्या संगतीने मुंबैकर गावातील प्रथा, परंपरा, कला, संस्कृती जाणून घेताना भारावून जातो. विनोदी संवादांतून कोकणातील लोकांच्या मनातील सलही तात्या गावकर आणि मंडळी लोकांपुढे मांडण्यात यशस्वी झाले आहेत. बक्कळ पैसा कमावण्याच्या ओढीने गावातील तरुण मंडळी मोठय़ा शहरांकडे धावतेय.

त्यामुळे गावातील संस्कृती, कला लोप पावतेय की काय,ही प्रबोधनात्मक संवादांतून प्रखरपणे मांडलेली ही गावक-यांची मनातील भीती अंतर्मुख करून जाते. गावातील जमीनजुमला येईल त्या किमतीला विकून पैसा कमावण्याचा फंडा सध्या सर्वत्र आहे. मात्र, त्याच जमिनीवर उभ्या राहणा-या उद्योगावर मजुरी करण्याची पाळी स्वत:वर येऊ देऊ नका, ही कळकळीची विनंती करताना ही गावकर मंडळी भविष्यातील कोकणाचे भयान रूपच जणू रसिकांसमोर मांडतात आणि सगळे स्तब्ध होतात.

'कोकणचा साज संगमेश्वरी बाज'ला मुलुंड येथे झालेल्या ९८ व्या मराठी नाटय़ संमेलनाच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण व्यासपीठ मिळाले. त्यावेळी उपस्थित रसिक आणि कलावंतांनी उभे राहून या टीमला दाद दिली कौतुक केले.त्यानंतर कोकणमध्ये एका पाठोपाठ एक प्रयोगांचा सिलसिला सुरू झाला.तीन - चार वर्षात सुमारे ५२५ हुन अधिक प्रयोगांचा टप्पा गाठणा-या या लोकनाटय़ाचा पहिला व्यावसायिक प्रयोग परळ (मुंबई) येथील दामोदर हॉलमध्ये मुंबईकर रसिकांच्या हाऊसफुल्ल प्रतिसादात झाला.त्या नंतर सतत मुंबई सह कोकण आणि अन्य भागात पुढील काही प्रयोग होणार आहेत.मुंबईकर कोकणवासीयांनी या लोकनाटय़ाचे कौतुक केले आहे.

कोकणी लोककला टिकाव्यात.त्या नव्या पिढीकडे हस्तांतरित व्हाव्यात.बोलीभाषा टिकावी.तसेच भाषा बोलण्याचा संकोच दूर व्हावा, हा आमचा प्रयत्न आहे. असे प्रतिपादन ह्या लोकनाट्य मधील तात्या गावकर,उत्तम गायक/कलाकार सुनील बेंडखळे यांनी केले आहे.म्हणूनच या दर्जेदार प्रयोगाचे आयोजन अर्चना थिएटर्स निर्मित,श्री पाणबुडी देवी कलामंच ( मुंबई ) प्रस्तुत व कलाप्रेमी व्यक्तीमत्व तसेच शक्ती -तुरा,नमनचे प्रयोग हाऊसफुल्ल करणारे सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार श्री.दिपक धोंडू कारकर आयोजित शुक्रवार दि.१० ऑक्टोबर २०२५ रोजी रात्रौ ०८ : ३० वा.सादर होणार आहे.अधिक माहितीसाठी दिपक कारकर-९९३०५८५१५३/९६५३३२३७३३ यांच्याशी संपर्क साधून,मनोरंजनाची परिपूर्ण हमी असणाऱ्या ह्या प्रयोगाला भरभरून प्रतिसाद द्या असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# श्रीवर्धन महावितरण चा गलथान व मनमानी कारभार

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन प्रतिनिधी**

श्रीवर्धन महावितरणाच्या गलथान व मनमानी कारभारामुळे श्रीवर्धन मधील नागरिक हैराण झाले आहे. शहरातील गणेश आळी मध्ये २६ सप्टेंबर ला पोल दुरुस्तीचे कारण देत दिवसभर विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला. लोखंडी खांब सूरज गद्रे यांच्या घराच्या अंगणात बसविण्यात आला. सदरचा खांब बसविण्या पुर्वी सूरज गंद्रे यांना कोणतीही कल्पना महावितरण च्या अधिकारी वर्गाकडून देण्यात आली नाही. आपली मनमानी करत अधिकारी वर्गाने सदर विद्युत चा खांब अंगणात बसवला. खांब बसवल्या तिथे जमा झालेली दगड माती उचल्यांचे भान सुद्धा महावितरण च्या कर्मचारी वर्गाला राहिले नाही. महावितरण चे अभियंता आशिष नावकर खांब बसवताना घटना स्थळी उपस्थित असल्याचे महावितरण कडून सांगण्यात आले. या पुर्वी चा सिमेंटचा खांब संरक्षक भिंतीत होते . मात्र महावितरण कर्मचाऱ्यांनी व अभियंता आशिष नावकर यांनी कामचुकारपणा करत वापरत असलेल्या अंगणात लोखंडी खांब बसवला आहे. सदरच्या लोखंडी विद्युत खांबामुळे कोणतीही दुर्घटना झाल्यास त्याचे दायित्व कुणाचे हा प्रश्न निर्माण झाला आहे.



कुंदन मोहन अपार्टमेंट मधील बहुतेक लहान मुले ज्या अंगणात खेळतात त्या अंगणात सदर चा खांब महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी बसवला आहे.सदरच्या खांबा मुळे वित्त व जीवित हानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. श्रीवर्धन शहरातील अनेक विद्युत खांब नाल्यावर बसविण्यात आलेले आहेत. मात्र कुंदन मोहन अपार्टमेंट च्या अंगणात खांब बसवून महावितरणाने त्याचा गलथान कारभार लोकांच्या निदर्शनास आणून दिला आहे. खांब बसविण्या साठी महावितरणाचे निकष अभियंता आशिष नावकर यांना माहित नसावेत का यांचे जनतेकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. अशा अधिकारी वर्गाला जागृत व दक्ष लोक प्रतिनिधी कडून विचारणा होणार का हे बघणे औचित्याचे ठरणार आहे .

> माझ्या घराच्या अंगणात लोखंडी खांब उभा करण्या पुर्वी मला कोणतीही कल्पना महावितरण विभागाकडून देण्यात आलेली नाही. त्या विरोधात मी ऑनलाइन पद्धतीने तक्रार अर्ज दाखल केला आहे. महावितरण च्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात यावी..
> सूरज गद्रे (तक्रादार ग्राहक )

> लोखंडी खांब बसविण्या पुर्वी जागा मालकाची परवानगी घेणे गरजेचे होते. कोणतीही दुर्घटना झाल्यास महावितरण जबाबदार राहील.
> बोरसे ( महावितरण अधिकारी श्रीवर्धन )

# रजनीकांत बोरेले यांचा गौमाता दुर्गोउत्सव मंडळ तर्फे सत्कार - गोलू पीपलवा





**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :-जितेंद्र खोडे**

**पांढरकवडा:-** येथील प्रसिध्द व्हिसल ब्लोअर आणि जिंदल पुरस्कार विजेता रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा सत्कार गौमाता दुर्गोउत्सव मंडळ चंद्रशेखर वार्ड, यांच्या वतीने गौमाता ची प्रतिमा भेट देवून सत्कार करण्यात आला. रजनीकांत बोरेले यांचा सत्कार मंडळ चे अध्यक्ष निखिल मिटपेल्लीवार,यांचे हस्ते करण्यात आला आहे या वेळी उपाध्यक्ष विक्की कनोजिया,अतुल चिट्टलवार,सूरज बावने, प्रणीत बेतवार यांच्या सह इत्यादी सदश्य या वेळी प्रामुख्याने उपस्थित होते,यावेळी रजनीकांत बोरेले यांचे सुपुत्र सर्वम बोरेले यांच्या हस्ते निखिल मिटपेल्लीवार यांचे कळडे आर्थिक देंणगी देण्यात आली आहे,या शिवाय अष्टभुजा माँ काली मंडळ हनुमान वार्ड या ठिकाणी सुद्धा रजनीकांत बोरेले यांनी भेट देवून विधिवत पूजा अर्पन केली,यावेळी मंडळ चे अध्यक्ष अजय अशोक कुंभरे यांना रजनीकांत बोरेले यांच्या हस्ते आर्थिक देंणगीभेट देण्यात आली,

या वेळी अक्षय (गोलू) पीपलवा,शुभम केळापूरे,दिलीप धामेचा,सागर वर्मा,बंटी बोरेले,सक्षम मिसाळ,शिवम बोरेले,आयशु तोड़साम,विक्रांत बोरेले अतुल मेश्राम हे रजनीकांत बोरेले यांच्या सोबत मंडळा ला भेट देतांना सोबत होते.

# विंचूरमध्ये शस्त्रपूजन, संघाचा संचलन सोहळा



**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीपूर्ती वर्षाच्या स्वागतार्थ व विजयादशमीचा पावन निमित्ताने विंचूर येथे भव्य शस्त्रपूजन व संघ संचलन सोहळा देशभक्तिपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज,भगवा ध्वज, संघ संस्थापक डॉ. हेडगेवार आणि श्री गुरुजी यांच्या प्रतिमांचे पूजन तसेच शस्त्रपूजनाने झाली. छत्रपती शिवाजी महाराज याच्या पुतळ्यापासून सुरुवात झालेल्या संचलनात शेकडो स्वयंसेवक सहभागी झाले. तर कार्यक्रम स्थळी कार्यकर्त्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

या प्रसंगी पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे बौद्धिक प्रमुख प्रा. सुनील नारायण कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी संघ म्हणजे फक्त शाखा नव्हे, तर संपूर्ण समाजशक्तीचे संघटन असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी संचलन 'पंच परिमार्जन' अभियानाची माहिती देण्यात आली. त्यात कुटुंब प्रबोधन, सामाजिक समस्या, पर्यावरणपूरक जीवनशैली, नागरिकांचे कर्तव्य पालन, स्वदेशी-स्वावलंबनाचा अंगीकार या पाच स्तंभांचा उल्लेख करण्यात आला.

प्रार्थना, सुप्रभात, पद्धतशीर शस्त्रपूजनाच्या माध्यमातून शौर्य, परंपरा व राष्ट्रीय स्मरण घडविण्यात आले.

संचलनाद्वारे शतकपूर्ती वर्षानिमित्त विविध उपक्रम राबविले जात असून, समाजातील सर्व घटकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# महेंद्रशेठ घरत हेच कॉंग्रेसचे उरण मतदारसंघाचे उमेदवार हवेत!;माजी जिल्हा परिषद सदस्य महेंद्र ठाकूर यांचे रोखठोक मत

**दैनिक युवक आधार**
**उलवे, प्रतिनिधी**

कॉंग्रेसला नवसंजीवनी हवी असेल तर महेंद्रशेठ घरत हेच कॉंग्रेसचे उरण मतदारसंघाचे उमेदवार हवेत, असे माजी जिल्हा परिषद सदस्य महेंद्र ठाकूर यांनी आढावा बैठकीत रोखठोक मत व्यक्त केले.

"पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे, पण कार्यकर्ते एकनिष्ठ आहेत. त्यामुळे उरण मतदार संघातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणूक जिंकण्यासाठी लढायचीय आणि जिंकून दाखवायची, ती धमक आपल्यात आहे. तरुणांनी पुढे यावे," असे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी तातडीची आढावा बैठक उरण तालुक्यातील खोपटे येथे रविवारी झाली. त्यावेळी महेंद्रशेठ बोलत होते. या आढावा बैठकीला कार्यकर्त्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. या बैठकीला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आता निवडणुका लढण्यासाठी आर्थिक बाब महत्त्वाची आहे. त्यामुळे पक्षाने त्याचाही विचार करावा, असेही मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

महिला अध्यक्षा रेखाताई घरत म्हणाल्या, "आगामी निवडणुकीत डोळ्यांत तेल घालून काम करावे लागेल. मत चोरीला आळा घालण्यासाठी निवडणूक याद्या तपासा."

कॉंग्रेसचे प्रदेश कमिटी सरचिटणीस आणि निरीक्षक डॉमनिक डिमेलो, मिलिंद पाडगावकर, डॉ. मनीष पाटील, उरण विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष विनोद म्हात्रे, अखलाख शिलोत्री, उरण तालुका महिला अध्यक्ष रेखाताई घरत, तसेच तालुक्यातील कॉंग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# आष्टी येथे आज माता रमाईचे प्रतिरूप अवतरणार...

**दैनिक युवक आधार**
**आष्टी- परतूर(अशोक ठोके)**

आष्टी,ता परतूर, जी.जालना येथे आज दिनांक ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता येथील मोरंगेश्वर मंगल कार्यालात बुद्धभूमी चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित व प्रकाश वाघ निर्मित 'मी रमाई' एकपात्री नाटकाचे आयोजन करण्यात आले असून भारतातील हे पहिले एकपात्री नाटक असून ते माता रमाबाई आंबेडकरांच्या धाडसी जीवनावर आधारित आहे, या नाटकाच्या माध्यमातून रमाबाईंचे रडणारे नव्हे, तर परिस्थितीशी दोन हात करणारा जिवन प्रवास लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या नाटकाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

यात या वर्षीच्या माता रमाई आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त लेखिका व रमाबाई आंबेडकर यांच्या मुख्य भूमिकेत सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे या आहेत... त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये भूमिका साकारलेल्या आहेत आम्ही जरांगे,डिलिव्हरी बॉय, प्रेमवारी, मालिका-बाळूमामाच्या नावानं चांगभलं,ज्ञानेश्वर माऊली,साता जन्माच्या गाठी,अशा अनेक मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत महाराष्ट्र भर प्रेक्षकांनी प्रचंड आत्तपर्यंत या नाटकास दाद मिळाली असुन डोळ्यासमोर जणु जिवंत माता रमाई यांचा जीवनपट पाहण्याचा अनुभव या नाटकातून होत असल्याने या नाटकास आष्टी सह परिसरातील मोठ्या संख्येने नागरिकांचा प्रतिसाद मिळणार असल्याचे नाटक आयोजन समितीचे आष्टीचे सरपंच मधुकर मोरे, गोळेगावचे सरपंच उद्धव डोळस, वंचितचे जिल्हा उपाध्यक्ष रोहन वाघमारे,गौतम शेळके,शिवाजी डोळस,यांच्या वतीने सांगण्यात येत आहे तरी परिसरातील सर्व रसिक प्रेक्षकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# १० ऑक्टोबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार 'सकाळ तर होऊ द्या' ; सुबोध भावे आणि मानसी नाईकची जोडी वेधणार प्रेक्षकांचे लक्ष

**दैनिक युवक आधार**
**कौतुक नागवेकर सांगली जिल्हा प्रतिनिधी**

'सकाळ तर होऊ द्या' हा मराठी चित्रपट १० ऑक्टोबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. मराठी-हिंदी चित्रपटांमध्ये विविधांगी व्यक्तिरेखा साकारणारा रसिकांचा लाडका अभिनेता सुबोध भावे या चित्रपटात आजवर कधीही न दिसलेल्या रूपात समोर येणार आहे. त्याच्या जोडीला प्रथमच मानसी नाईक दिसणार असल्याने 'सकाळ तर होऊ द्या'बाबतची प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.



'सकाळ तर होऊ द्या' या मराठी चित्रपटाची निर्मिती निर्मात्या नम्रता सिन्हा यांनी श्रेय पिक्चर कंपनीच्या बॅनरखाली केली आहे. समिट स्टुडिओज आणि मधु शर्मा या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. दिग्दर्शक आलोक जैन यांनी 'सकाळ तर होऊ द्या'द्वारे मराठी सिनेसृष्टीत पाऊल ठेवले आहे. टीझर मागोमाग आलेल्या उत्कंठावर्धक ट्रेलरमुळे सगळीकडे या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे यात सुबोध आजवर कधीही न दिसलेल्या रूपात आहे. त्याच्या जोडीला सौंदर्य आणि नृत्याचा मिलाफ घडवत रसिकांना घायाळ करणारी मानसी नाईक आहे. या चित्रपटातील 'नाच मोरा नाच...' हे गाणे अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे. याखेरीज 'सकाळ तर होऊ द्या...' हे शीर्षक गीत व 'जगू दे मला...' सारखी सर्व अर्थपूर्ण गाणीही रसिकांच्या मनाचा ठाव घेत आहेत.

चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत आलोक जैन म्हणाले की, 'सकाळ तर होऊ द्या'च्या रूपात आम्ही एक परिपूर्ण मनोरंजक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आणला आहे. यातील दोन्ही व्यक्तिरेखा अतिशय दमदार असून, सुबोध आणि मानसी यांनी पूर्ण ताकदीनिशी त्या साकारल्या आहेत. त्यामुळे प्रेक्षकांना या चित्रपटात अभिनयाची अनोखी जुगलबंदी पाहायला मिळेल. त्या जोडीला कर्णमधूर संगीतही आहे. उत्तम सादरीकरण आणि वातावरणनिर्मिती या चित्रपटाच्या जमेच्या बाजू आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने मराठी रसिकांना एक वेगळ्या धाटणीची आणि क्षणोक्षणी उत्कंठा वाढवणारी रहस्यमय कलाकृती पाहायला मिळेल याची खात्रीही जैन यांनी दिली आहे.

ओंकार बर्वे आणि अंकुश मारोडे यांनी 'सकाळ तर होऊ द्या' चित्रपटाचे संवादलेखन केले आहे. अभिषेक खणकर यांनी गीतलेखन केले असून, गायक-संगीतकार रोहित राऊत यांनी संगीत दिग्दर्शन केले आहे. हिमेश रेशमिया मेलोडीज या लेबलखाली या चित्रपटातील गाणी संगीतप्रेमींच्या भेटीला आली आहेत. छायांकन सुनील पटेल यांनी केले असून, सिनेपोलीस या चित्रपटाचे वितरण करणार आहेत.

# क्रीडा कौशल्य ही आयुष्याची भक्कम पायाभरणी – माजी शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय क्रीडा संकुलात सुरू असलेल्या पावसाळी विभागीय क्रीडा स्पर्धेत भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयाचा विद्यार्थी सोफियान दगडू शहा याने कुस्तीमध्ये आपल्या दमदार खेळाची झलक दाखवत प्रतिस्पर्धी असलम पठाण कन्नडकरचा पराभव केला. जिल्हा स्तरावर विजेता ठरलेला सोफियान आता विभागीय स्तरावर चमक दाखवण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या या पराक्रमामुळे शाळा, गाव आणि पालकांचा अभिमान उंचावला आहे.



सोफियान शहाचा गौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी बोलताना माजी शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख यांनी क्रीडेचे महत्त्व अधोरेखित केले. देशमुख म्हणाले, *"क्रीडा ही केवळ शारीरिक ताकद दाखविण्याची जागा नाही, तर ती आयुष्याची भक्कम पायाभरणी करते. अंगभूत क्रीडा कौशल्याच्या जोरावर विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये यश संपादन करतात. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विजय त्यांना मानाचे प्रमाणपत्र देतो. हे प्रमाणपत्र फक्त कागदावरची नोंद नसते, तर आयुष्यभर आत्मविश्वासाने जगण्याची उर्जा असते. प्राथमिक आणि माध्यमिक टप्प्यावर विद्यार्थ्यांनी अशी तयारी केली, तर ती पालकांच्या अभिमानातही भर घालते."*

देशमुख यांनी पुढे सांगितले की, "आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाइतकेच क्रीडा देखील महत्त्वाची आहे. खेळ विद्यार्थ्यांना शिस्त, मेहनत, संघभावना, संयम आणि चिकाटी शिकवतो. हे गुण त्यांना भविष्यातील सर्वच आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम करतात."

या कार्यक्रमाला सेवानिवृत्त शिक्षण उपसंचालक श्री. तुपे, श्री. अशोकदादा गरूड, प्रा. शाम सरकटे, आबासाहेब जगताप, श्री. व्हि. कोमटवार, मनोज पाटील, राकेश गांगुर्डे, श्री. दाभाडे, अविनाश सुरडकर, डीगंबर भोसले, अनिल दुतोंडे, नरेश बलकार, संदीप देशमुख, राधिका शेळके, शुभांगी सोनवणे यांच्यासह पालक, अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गौरव सोहळ्याच्या शेवटी उपस्थितांनी सोफियानला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, विभागीय तसेच राज्य स्तरावर तो आणखी मोठे यश मिळवेल, असा विश्वास व्यक्त केला.

# स्वामी समर्थ गुरुपीठाचे गुरुपुत्र चंद्रकांतदादा यांचे सोयगावत दि. ८ ऑक्टोंबरला हितगुज सोहळा

**दैनिक.युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर,जि.नाशिक यांच्या वतीने आदरणीय गुरुपुत्र श्री चंद्रकांतदादा यांच्या प्रशासनिक दौऱ्याचा व अमृततुल्य हितगुज सोहळ्याचा कार्यक्रम बुधवार, दि. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम सोयगाव शैदुर्णी बायपास येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोर येथे दुपारी ३ ते सायं.५ वाजेपर्यंत होणार असून भाविक व नागरिकांसाठी प्रवेश मुक्त ठेवण्यात आला आहे.

परमपूज्य स्वामी समर्थ महाराजांच्या कृपा आशीर्वादाने व परमहंस गुरुश्री अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.चंद्रकांतदादा समाजकार्य, आरोग्य,अध्यात्म आणि मानवसेवा या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहेत.



त्यांच्या मार्गदर्शनातून अनेक आध्यात्मिक व सामाजिक उपक्रम राबविले जात असून भाविकांमध्ये त्यांचा संदेश जागरूकता निर्माण करणारा ठरतो.

या अमृततुल्य हितगुज सोहळ्यात आरोग्य,अध्यात्म, संस्कार व जीवनमूल्यांवर आदरणीय चंद्रकांतदादा आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाच्या यशासाठी स्वामी समर्थ सेवा मंडळ सोयगाव,सेवक तुकाराम चिंतामण तायडे,राजेंद्र काशीनाथ भामरे

आणि तालुक्यांचे सेवक कार्यरत आहेत.कार्यक्रमाचे सौजन्य श्रीकृष्णा ज्वेलर्स,सोयगाव यांनी स्वीकारले असून भाविकांनी या आध्यात्मिक मेजवानीस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे केले आहे.

# दळे परिसरातील भात शेतीचे करपा रोग,नुकसान भरपाईची स्वप्निल सोगम यांची आ. भैय्या सामंत यांच्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**राजापूर:-(प्रमोद तरळ)**

तालुक्यातील दळे परिसरात भात शेतीवर करपा रोग पडल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो की काय अशा विचाराने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे आधीच प्रचंड प्रमाणात पडत असलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळविले असताना आता करपा रोग पडल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे शेतकऱ्यांची वर्षभराची मेहनत वाया जाणार आहे या विचाराने शेतकरी वर्गाची झोप उडाली आहे तालुक्यातील कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतीच्या बांधावर जाऊन पंचनामे करावेत तशा सूचना आमदार महोदयांनी तहसीलदार व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना द्याव्यात शेतकऱ्याना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी दळे परिसरातील सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी स्वप्निल सोगम यांनी आमदार श्री सामंत यांना दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात केली आहे सदरचे निवेदन आमदार श्री किरण उर्फ भैय्या सामंत यांना रत्नागिरी शासकीय विश्रामभाम येथे गिरीश करगुटकर यांनी सादर केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला मानव मुक्तीचा नवा मार्ग – प्राचार्य राहुल डोंगरे

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा :** धम्मचक्र प्रवर्तन दिन व विजयादशमी निमित्ताने स्थानिक लुंबिनी बुद्ध बुद्ध विहार येथे ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्राचार्य राहुल डोंगरे होते. अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक राजूभाऊ चामट तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार संजीव भांबोरे व राधेश्याम तिरपुडे हे उपस्थित होते.

प्राचार्य राहुल डोंगरे आपल्या भाषणात म्हणाले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे मुके बोलू लागले, आंधळे पाहू लागले आणि लंगडे धावू लागले. महाडच्या चवदार तळ्यातून बाबासाहेबांनी समानतेची बीजे रोवली तर काळाराम मंदिर प्रवेशातून सामाजिक हक्काची जाणीव करून दिली. १४ ऑक्टोबर १९५६



नंतर समाजात मोठे सांस्कृतिक परिवर्तन झाले. अनेक आयएएस-आयपीएस तयार झाले, भारतीय समाजाने गावकुसाबाहेर पडून प्रगतीचा मार्ग स्वीकारला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून राष्ट्राच्या उभारणीत योगदान देऊ लागला."

ते पुढे म्हणाले की, "न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्त्वे बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून समाजाला बहाल केली. त्यांनी भगवान बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज यांना गुरु मानून पुरोगामी विचारांची पेरणी केली. 'माझं कुटुंब म्हणजे भारत देश, मी प्रथमतः भारतीय आणि अंतिमतः भारतीय' आहे. प्रत्येकानी ,ज्यांच्याकडे बुद्धी आहे त्यांनी समाजाला बुद्धी द्यावी, ज्यांच्याकडे वेळ आहे त्यांनी वेळ द्यावा,ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांनी दान द्यावे आणि प्रत्येकानी चिकित्सक विचार पेरून आणि अंगीकार करून बाबासाहेबांचे प्रबुद्ध भारताचे स्वप्न साकार होईल."खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मानव मुक्तीचा नवा मार्ग दिला. या भारतावर डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे अनंत उपकार असल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला लुंबिनी धम्म बोधी संस्थेचे अध्यक्ष राधेश्यामजी तिरपुडे, सहसचिव अरुण रामटेके, कोषाध्यक्ष पृथ्वीराज मेश्राम, अशोक लाडे, सोपान शेंडे, निरंजन गजभिये, तसेच सम्यक महिला मंडळाच्या अध्यक्षा प्रणिता मेश्राम, उपाध्यक्षा बबिता कांबळे, सचिव नादिरा रामटेके, सुधाताई चौरे, अनु गजभिये, जोशना गावंडे, सुरेखा गजभिये व इंदिरा तिरपुडे, ज्योत्स्ना गावंडे, सुरेखा गजभिये यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराना मानणारे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन बबिता कांबळे यांनी केले. प्रास्तविक सुधा चवरे यांनी केले.आभार सुरेखा गजभिये यांनी मानले.

# जिल्हास्तरीय देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत थेपडे विद्यालयाने पटकाविला तिसरा क्रमांक



**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील**

गांधी रिसर्च फाउंडेशन यांच्या मार्फत दरवर्षी होणाऱ्या जिल्हास्तरीय देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत स्वा. सै. पं. ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय म्हसावद ता जि जळगाव या विद्यालयाला ग्रामीण भागात जिल्हास्तरीय *तृतीय क्रमांक* मिळाला. गांधी जयंती निमित्त होणारी गीत गायन स्पर्धा ही 30/9/2025 झाली होती. शहरी व ग्रामीण असे दोन विभाग स्पर्धेसाठी होते त्यात जिल्ह्यातील बहुसंख्य शाळांनी सहभाग घेतला होता. लयबद्ध स्वर, सुरांची व संगीताची उत्तम साथ घेऊन इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी हे उज्वल यश प्राप्त केले. हा पुरस्कार जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री आयुष प्रसाद सर यांनी प्रदान केला. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन श्री एस सी बाविस्कर सर व सहकारी श्री डी एम सोनवणे सर यांनी केले होते. विद्यालयाचे प्राचार्य श्री पी डी चौधरी सर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. उपप्राचार्य श्री जी डी बच्छाव सर तसेच पर्यवेक्षक के पी पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले होते. संस्थेचे चेअरमन माननीय श्री के पी थेपडे यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक तसेच सर्व शालेय परिवाराचे अभिनंदन केले. पुरस्कार सोहळा जळगाव येथील गांधी उद्यानात संपन्न झाला. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य श्री पी डी चौधरी सर उपाप्रचार्य श्री. जी डी बच्छाव व पर्यवेक्षक श्री के पी पाटील सर शिक्षक प्रतिनिधी श्री सचिन चव्हाण सर ज्येष्ठ शिक्षक श्री एस एम नेतकर सर, मार्गदर्शक शिक्षक श्री एस सी बाविस्कर सर, श्री. एन. के अहिरे, श्रीमती ए डी नेवे मॅडम, श्री टी वाय मगरे, सर श्री पी ए महाजन सर, श्री पी ए बाविस्कर सर, श्रीमती पी पी चव्हाण मॅडम, श्रीमती कविता पाटील मॅडम, श्रीमती संगीता पाटील मॅडम, श्रीमती भावना चौधरी मॅडम, श्रीमती दीपिका पाटील मॅडम, श्रीमती के बी पाटील मॅडम, श्री अमोल चौधरी सर, श्री निलेश पवार सर, श्रीमती योगिता पाटील मॅडम, श्री अरविंद पाटील सर, श्री पी पी मगरे सर, श्री वाय एन शिंदे सर तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री पवन मोरे सर राहुल कोळी हे उपस्थित होते.

# आदी कर्मयोगी अभियान ; डिस्ट्रीक्ट ओरिएंटेशन नांदेडात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी विशाल भालेराव**

**किनवट :** धरती का आबा भगवान शहीद बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे हे 150 वे वर्ष आहे. या आदी सेवा पर्वाच्या स्मरणार्थ केंद्रीय आदिवासी कार्य मंत्रालयाच्या वतीने "आदी कर्मयोगी अभियान-प्रतिक्रियाशील सुशासन कार्यक्रम " हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शेवटच्या घटकांपर्यंत सेवा व लोककेंद्रित विकासाची पूर्तता करणे या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यानुषंगाने नांदेड येथील डॉ.शंकरराव चव्हाण नियोजन भवनच्या सभागृहात नुकतेच डिस्ट्रीक्ट ओरिएंटेशन संपन्न झाले .

यावेळी जिल्हाधिकारी राहूल कर्डिले , दृकश्राव्य माधमाद्वारे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली व विविध विभागाचे जिल्हा प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवटचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी जेनित चंद्रा दोंतुला यांनी प्रास्ताविकातून या अभियानाची माहिती दिली. सहायक प्रकल्प अधिकारी ( विकास / योजना) प्रदीप नाईक यांनी पीपीटी प्रेझेंटेशन केले.

याप्रसंगी नागपूर येथे स्टेट प्रोसेस लॅबमध्ये सहभागी झालेले नांदेड जिल्ह्यातील आठ डिस्ट्रीक्ट मास्टर ट्रेनर वन परिक्षेत्राधिकारी सचिन धनगे , अधिक्षक संदीप कदम , उप अभियंता एस .पी. गोविंदवाड , तालुका आरोग्य अधिकारी डॉ.के.पी. गायकवाड , बाल विकास प्रकल्पाधिकारी उमेश मुदखेडे , विस्तार अधिकारी (पं) वसंत वाघमारे व केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे यांनी या अभियानाविषयी सर्व विभाग प्रमुखांना पुढील माहिती दिली. विकसित भारत @ 2047 च्या दृष्टीने शेवटच्या टप्प्यातील अभिसरण व प्रभावी सेवा समर्पणाला प्रोत्साहन देण्यासाठी देशातील 20 लाख युवा आदिवासी नेत्यांना प्रशिक्षीत व एकत्रित करून त्यांच्या भरीव सहभागातून देशातील 30 राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील 550



"यानुषंगाने नांदेड जिल्ह्यातील 169 आदिवासी गावांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे. शासनाचा हा अभिनव उपक्रम आहे.' कर्मयोग ' या संकल्पनेवर हे आधारित आहे. यामध्ये विविध विभागाचा प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांची भूमिका , जबाबदारी व आत्ममूल्यांकन हे महत्वाचे आहे. आदी कर्मयोगी अभियानाचे ठळक मुद्दे पुढील प्रमाणे : आदिवासी पाड्यातील लोकांना सक्षम बनविणे तसेच स्थानिक नेतृत्वाला संधी देणे , आदी कर्मयोगी अभियान हे सेवा , संकल्प व समर्पण या मुल तंत्रावर आधारलेले आहे."
-राहुल कर्डिले , जिल्हाधिकारी , नांदेड

जिल्ह्यातील तीन हजार तालुक्यांमधील एक लाख आदिवासी गावांमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करून "आदिवासी गाव व्हिजन 2030 घोषणापत्र " मंजूर करण्यात येणार आहे. ही जगातील सर्वात मोठी तळागाळातील आदिवासी नेतृत्व चळवळ आहे. याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री कर्डिले यांनी सर्वांना आदी कर्मयोगी शपथ दिली.

# पनवेल महानगरपालिकेकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी कृतज्ञता संवाद दिन, 9 ऑक्टोबरला विविध कार्यक्रमांचे आयोजन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेमार्फत येत्या 09 ऑक्टोबरला गुरुवारी ज्येष्ठ नागरिक दिन कृतज्ञता संवाद दिनाचे आयोजन पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात या विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक 1 ऑक्टोबर रोजी जेष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात येतो. या औचित्याने कृतज्ञता संवाद दिनाचे आयोजन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे. 09 ऑक्टोबर रोजी दुपारी अकरा ते सायंकाळी सहा या वेळेत हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी व प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिराने होईल.

त्यासोबतच ज्येष्ठ वर्गाला होत असलेला सायबर धोका लक्षात घेता पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी यांचे ज्येष्ठांची सायबर फसवणूक संदर्भात चर्चासत्र व प्रश्नोत्तराचा कार्यक्रम होईल. तसेच अभिजात मराठी भाषा संदर्भात व्याख्यानाचे आयोजन यावेळी करण्यात आले आहे.

**ज्येष्ठांसाठी विविध गुणदर्शन**

ज्येष्ठ मंडळीच्या सुप्त कला-गुणांना वाव देण्यासाठी त्यांना हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी, त्यांनीच बसवलेला विविध गुणदर्शन कार्यक्रम यावेळी नाट्यगृहात होईल. यात नृत्य, नाटक, गीत, मिमिक्री, नक्कल, काव्यवाचन, एकपात्री अभिनय, अशा कला ज्येष्ठ नागरिक मंडळी सादर करतील. याचबरोबर संगीत रजनीचेही आयोजन करण्यात आले आहे. तसेच जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ नागरिकांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार केला जाईल.

या कार्यक्रमास पनवेल महानगरपालिका हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांनी आवर्जून मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पनवेल महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# पूरग्रस्तांसाठी क्रांतिकारी शिक्षक संघटनेचा हात पुढे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

बीड जिल्ह्यातील बिंदुसरा नदीकाठी वसलेल्या वस्त्या अलीकडील पुरामुळे पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या. अनेक कुटुंबे उघड्यावर आली, आयुष्यभराची संपत्ती वाहून गेली. या कठीण प्रसंगी क्रांतिकारी शिक्षक संघटनेने सामाजिक बांधिलकी जपत पूरग्रस्त बांधवांना किराणा किटचे वितरण करून माणुसकीचा हात पुढे केला. क्रांतिकारी शिक्षक संघटना ही केवळ शिक्षकांच्या हक्कासाठी लढणारी नाही, तर समाजातील प्रत्येक संकट समयी मदतीसाठी तत्पर असणारी संघटना आहे. अनाथ मुलांना आर्थिक मदत, रुग्णांना उपचार सहाय्य, तसेच आपत्तीग्रस्तांना तात्काळ मदत अशा अनेक सामाजिक उपक्रमांतून संघटनेने "शिक्षक म्हणजे समाजाचे आधारस्तंभ" हे सिद्ध केले आहे. या मदतकार्याचे मार्गदर्शन संघटनेचे सचिव श्री.शाहीद कादरी यांनी केले. या वेळी आ.सतीश पवार, असरार सर, राजू सर, प्रा.डॉ.शशिकांत गायकवाड, सगिर सर, मुबिन सर, तसेच संघटनेचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. या



प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जमीयतचे मराठवाडा उपाध्यक्ष मौलाना झाकीर साहेब, मौलाना बाखि साहेब, मोईन मास्तर साहेब, एम.आय.चे नेते शफिक भाऊ, खुर्शीद आलम, ज्येष्ठ शिक्षक शफिक हाश्मी साहेब, दिव्य वार्ताचे संपादक अबुबकर चाऊस साहेब, नेते फारुख पटेल साहेब सह इतर मान्यवर उपस्थित होते. क्रांतिकारी शिक्षक संघटनेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, "शिक्षक केवळ वर्गातच नाही समाजातही प्रकाश पसरवतात" हा संदेश या कार्यातून अधोरेखित झाला आहे. या मदतीस संघटनेचे फिरदोस मॅडम, नवीद सर, समियोद्दीन सर, परवेज सर, नकीब जहॉ मॅडम, फारहाना मॅडम, नादेरा मॅडम, नाईला मॅडम, हुमेरा मॅडम सह आदि पुढे आले.

# खारघर — मालमत्ता कर लाखोंमध्ये; सुविधा व सुरक्षा मागास — झाडांची अर्धवट छाटणी धोकादायक

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

झाडांची छाटणी न करताच करोडो रुपयांची बिले पास अकार्यक्षम ठेकेदारांची चौकशी व्हावी, अशी शिव सेना उध्दव बाळासाहेब ठाकरे उपशहर प्रमुख खारघर शहर नंदु वारुंगसे यांच्या सह नागरिकांची मागणी

खारघर परिसरातील नागरिक आता फक्त झाडांच्या अर्धवट छाटणीचा नव्हे, तर मालमत्ता कर वसुलीनंतरही दुर्लक्षित राहणाऱ्या मूलभूत सुविधांचा प्रश्न उपस्थित करीत आहेत. परिसरातील अनेक घरांवर लाखो रुपयांचा मालमत्ता कर आकारला जात असूनही पनवेल महानगरपालिकेकडून वारंवार दिल्या जाणाऱ्या आश्वासनांनंतरही पायाभूत सुविधा व सुरक्षेवर परिणामकारक लक्ष दिले जात नाही, अशी नागरिकांची तीव्र नाराजी आहे.

शहरी रस्त्यांवरील झाडांची छाटणी करण्यासाठी महानगरपालिकेने ठेकेदार कंपनीला काम सोपवले आहे. *मात्र, संबंधित कंपनीकडे आवश्यक साधनसामग्री व तज्ज्ञ कर्मचारी नसल्याने झाडांची छाटणी नीट होत नाही.परिणामी अनेक रस्त्यांवर झाडांच्या फांद्या लोंबकळत राहिल्या असून, पादचारी, दुचाकीस्वार, वाहनधारक तसेच शालेय विद्यार्थी गंभीर धोक्यात आले आहेत.

नागरिकांनी आरोप केला आहे की, "झाडांची छाटणी प्रत्यक्षात न करता करोडो रुपयांची बिले पास केली जात आहेत. हे भ्रष्टाचाराचे स्पष्ट उदाहरण आहे. जर महानगरपालिका अशा अकार्यक्षम ठेकेदारांना धार्जिणी असेल तर सुरक्षा व पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते."

**नागरिकांची मागणी**

1. ठेकेदार कंपनीची तातडीने चौकशी करून बिले थांबवावीत.

2. अकार्यक्षम कंपन्यांना काळ्या यादीत टाकावे.

3. नवीन व तज्ज्ञ कंपन्यांना काम सोपवून झाडांची योग्य पद्धतीने छाटणी करावी.*4. नागरिकांनी भरलेला मालमत्ता कर कोणत्या सुविधांवर खर्च होतो, याचा



पारदर्शक अहवाल प्रसिद्ध करावा.

खारघरमधील नागरिक आता अधिक सहनशील राहणार नाहीत, असे स्पष्ट करत महानगरपालिकेने त्वरित कारवाई करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

# सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघ पुणे यांचा पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघ,पुणे यांच्या टीमने बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा शैक्षणिक उपक्रम राबवला. संघाकडून आष्टी तालुक्यातील सांगवी (पाटण) आणि धनगरवाडी येथील शाळांमध्ये सुमारे २८० शालेय साहित्य किटचे वाटप करण्यात आले.पुणे येथून आलेल्या टीमचे ग्रामपंचायत सांगवी पाटण जि प प्रा शाळा,सुदर्शन विद्यालय व जि प प्रा.धनगरवाडी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला

या उपक्रमातर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी पाटण,सुदर्शन विद्यालय सांगवी पाटण आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,धनगरवाडी येथील विद्यार्थ्यांना वह्या,पेन्सिल,पेन इत्यादी आवश्यक शालेय साहित्याचे किट देऊन सन्मानित करण्यात आले.पुरामुळे प्रभावित झालेल्या या मुलांच्या



शिक्षणात सुरळीतपणा यावा,हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते समीर शेख यांनी उपस्थितांना संबोधित केले.त्यांनी सांगितले की,"वेळेला केलेली एक छोटीशी मदत तिचे मोल अनमोल असते. पुण्य जर कमवायचे असेल तर गरजवंतांना मदत केली तर पुण्य भेटते. आपण शिवरायाचे मावळे आहोत. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे. आपण जसा विचार करतो तसं आपण घडतो. एक हात मदतीचा उपक्रम कौतुकास्पद आहे."

हे शालेय साहित्य किट वाटप करताना संघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष श्री.किशोर थोरात यांनी सांगितले,"पुराच्या आपत्तीमुळे मुलांचे शिक्षण खंडित झालेल नाही,याची काळजी घेणे आपली जबाबदारी आहे.या छोट्या-सा प्रयत्नातून मुलांना शिक्षणाकडे वाटचाल करण्यास प्रोत्साहन मिळेल,अशी आशा आहे."

यावेळी कार्यक्रम प्रसंगी सरपंच दत्तात्रय खोटे,सरपंच महाडिक उपसरपंच राहुल खिलारे,लक्ष्मण भोसले,महेश खिलारे, अविनाश भोसले,पत्रकार मारुती सत्रे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख,निलेश तरटे मुख्याध्यापक साईनाथ बोडखे,मुख्याध्यापक चांगदेव तरटे, मुख्याध्यापक वशिष्ठ तरटे सर,सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी ग्रामस्थ उपस्थित होते.

या प्रसंगी संघाचे पुणे शहर जनरल सेक्रेटरी श्री. रविंद्र आळणे,सदस्य श्री. अमित कोकणे,श्री.अमोल भोसले,श्री. सुरेंद्र नाथ,श्री.सागर तावरी,शिक्षिका क्षमा काळे मॅडम आणि रीना शिंदे मॅडम या सर्वांचे सहकार्य लाभले.या मदतीसाठी सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघ,आधार शैक्षणिक संस्था,श्री समर्थ शैक्षणिक व सामाजिक संस्था ,एक्सलंट इंटरनॅशनल स्कूल, अथर्व वॉटर टेक् सोल्युशन्स,अमुकेट प्रॉडक्ट्स अँड टेक् सोल्युशन आणि इतरहीयांनी सहकार्य केले .

संघाच्या या समाजहितैषी कार्यामुळे शाळांच्या शिक्षक,विद्यार्थी व पालक यांनीही त्यांचे आभार मानले. पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा निर्धार दाखवल्याबद्दल संस्थेचे कौतुक करण्यात आले.

---

## "प्रहार राष्ट्रीय लघुपट महोत्सव 2025" यांचे भव्यदिव्य आयोजन केले आहे



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

प्रथम क्रमांक 1 लाख,द्वितीय क्रमांक 75 हजार. तृतीय क्रमांक 50 हजार रुपये

व इतर बक्षीसे सन्मानचिन्ह मानपत्र व प्रत्येक सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

**हीच आहे लाखाची बक्षीसे जिंकण्याची संधी**

प्रहार परिवाराकडून लघुपटाला उच्च दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने अनेक नवनवीन संकल्पना वंदनीय बच्चूभाऊ कडू यांनी आखल्या आहेत तरी या "प्रहार राष्ट्रीय लघुपट महोत्सवात" आम्ही दिलेल्या विषयावर 1 ते 30 मिनिटापेटीत लघुपट बनवून 15 नोव्हेंबर 2025 पर्यत आमच्यापर्यंत गुगल ड्राइव्ह लिंक किंवा पेन ड्राईव्ह लघुपट पाठवावा आमच्या पेजवर गुगल फॉर्म लिंक उपलब्ध आहे

अधिक माहितीसाठी प्रहार चित्रपट संघटना पदाधिकारी अथवा खालील नंबर वर संपर्क करा

खलील विषय

शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी आणि कामगार समस्या, आरोग्य,शिक्षण आणि आर्थिक विषमतेचे परिणाम, भ्रष्टाचार, महिला आणि बाल हक्क, जातीभेद आणि धर्मभेद,

**संपर्क**
**संदीप मोहिते पाटील**
**मो.7758001961**

---

## निफाड पूर्व भागातील नापीक क्षेत्रासाठी खा. भास्कर भगरेही मैदानात, आपत्तीग्रस्तांसह जिल्हाधिकाऱ्यांची घेणार भेट

**दैनिक आधार निफाड**
**तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**देवगाव :-** निफाड तालुक्याच्या पूर्व भागातील देवगाव, रुई, कोळगाव, कानळद, खेडलेझुंगे, शिरवाडे, वाकद या गावांतील शेतात कालव्यांची गळती व पावसाचे पूरपाणी साचल्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेती नापिक बनल्याने शेतकऱ्यांवर संकट कोसळले असून, या पार्श्वभूमीवर खा. भास्कर भगरे यांनी नुकसानीची पाहणी केली.

यावेळी त्यांनी देवगाव गटातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रश्न निकाली काढण्यासाठी बैठक घेण्याची घोषणा केली. चर व नाल्यांचे तात्काळ सर्वेक्षण करून वस्तुनिष्ठ अहवाल तयार करून शासनस्तरावर सादर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. गोदावरी डावा कालवा व जलद कालव्यांतून गळती होणारे पाणी तसेच विंचूर, डोंगरगाव, नांदगाव, धानोरे, भरवसफाटा, मानोरी, रुई, महादेवनगर परिसरातील पावसाचे पाणी देवगाव, रुई, कोळगाव, कानळद, खेडले भागातील



शेतांमध्ये साचते. जलनिस्सारण विभागाची चर योजना अपुरी असल्याने हे पाणी शेतात तुंबून दरवर्षी सुमारे हजार ते पंधराशे हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी खासदार भगरे यांच्याकडे मांडल्या.

खासदार भगरे यांनी शेतकऱ्यांच्या सर्व समस्या गांभीर्याने ऐकून घेतल्या आणि या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. अवकाळी पाऊस व कालव्यांची गळती यामुळे झालेले नुकसान लक्षात घेता तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

नुकसानग्रस्त द्राक्षबाग व फळबागांचे स्वतंत्र पंचनामे करून अहवाल तयार करण्याचे आदेश शासनाने दिले असून, त्या अनुषंगाने भगरे यांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा कृषी अधिकारी रविंद्र माने, तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना दूरध्वनीवरून सूचना दिल्या.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य भाऊसाहेब बोचरे, माजी सरपंच विनोद जोशी, उपजिल्हाप्रमुख निवृत्ती जगताप, डॉ. सुजित गुंजाळ, तालुकाप्रमुख शिवा सुरासे, गणेश महाले, बद्रीनाथ लोहारकर, उपसरपंच लहानू मेमाने, विलास शिंदे, ज्ञानेश्वर तासकर, वैभव तासकर, अशोक वाळुंज, करण वावधाने, मनोहर बोचरे, जयवंत लोहारकर, बाळासाहेब साबळे आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आता खा. भास्कर भगरेही मैदानात**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार रोहित पवार यांनी निफाड पूर्व भागातील नापीक क्षेत्राचा प्रश्न सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांना तातडीने सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. शेतकऱ्यांना बसलेल्या मोठ्या आर्थिक फटक्याची दखल घेऊन आता खासदार भास्कर भगरे यांनीही मैदानात उतरून प्रश्न निकाली काढण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

---

## मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा दिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

स्थानिक मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने दि. 03 ऑक्टो. 2025 रोजी अभिजात मराठी भाषा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे हे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कवी डॉ.बी.आर.तनपुरे यांची उपस्थिती होती. आपल्या प्रास्ताविकातून डॉ. विष्णू लांडे यांनी अभिजात मराठी भाषा दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या निकष पात्र अशा भाषेस अभिजात भाषेचा दर्जा दिला जातो. या निकषांमध्ये त्या भाषेचे वयोमान किमान दीड हजार वर्ष असावे, भाषेस समृध्द व उत्कृष्ठ साहित्य परंपरा असावी, भाषेने आपली प्राचीन व सांस्कृतिक परंपरा जतन केलेली असावी. यासारखे निकष



पूर्ण केल्यानेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असल्याचे सांगितले. आपल्या मार्गदर्शनात डॉ. बी.आर.तनपुरे यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यात राजा हाल यांच्या गाथासप्तशती या ग्रंथाचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे सांगितले. हा दर्जा मिळाल्याने मराठीतील सांस्कृतिक आणि साहित्यिकांचा गौरव केला जाईल, प्राचीन ग्रंथाचे इतर भाषेत अनुवाद होतील, भाषेची ओळख जागतिक स्तरापर्यंत जाण्यास मदत होईल, भाषेचे स्वयंभूपण सिध्द होण्यास मदत होईल, भाषेच्या संशोधन आणि विकासाला वाव मिळेल. या शिवाय देशातील सर्व विद्यापीठांतून मराठी भाषा ही शिकण्याची संधी मिळणार असल्याचे सांगितले. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून डॉ. जी.एस. कुबडे यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेच्या विविध बोलींचा अभ्यास केला जाईल, या भाषेतील प्राचीन व आधुनिक साहित्य संग्रहासाठी विशेष प्रोत्साहन दिले जाईल, अनेक भाषाशास्त्रज्ञ व संशोधकांना संशोधनाची संधी मिळेल. संपूर्ण देशभरातील विद्यापीठांत हा विषय शिकविला जाणार असल्याने, या भाषेचा प्रचार आणि प्रसार होण्यास मदत मिळणार असल्याचा आशावाद वर्तविला. अभिजात भाषेच्या दर्जामुळे मराठी भाषेचा सन्मान झाला असला तरी, हा सन्मान चिरंतन टिकवून ठेवण्याची जबाबदारी ही मराठी भाषिकांची असल्याचे सूचित केले. कार्यक्रमाकरीता महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पल्लवी वानखेडे हिने, तर उपस्थितांचे आभार कु. कोमल कालापाड हिने मानले. कार्यक्रमांची सांगता पसायदानाने झाली.

---

## न्यू इंग्लिश स्कूल चनेरा येथील विद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा



**दैनिक युवक आधार**
**रोहा/रायगड**

न्यू इंग्लिश स्कूल चनेरा येथील विद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला.फणसाड अभयारण्य वनविभाग ठाणे वनपाल आदेश पोकळ यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. वन्यजीव सप्ताह दरवर्षी २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर दरम्यान साजरा केला जातो. या सप्ताहाचा उद्देश लोकांमध्ये वन्यजीव संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करणे हा आहे.

भारतात वन्यप्राण्यांची संख्या सातत्याने कमी होत चालली आहे. अतिक्रमण, जंगलतोड, बेकायदेशीर शिकार, आणि हवामान बदल यामुळे अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करून लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली जाते की हे प्राणी आणि निसर्गाचं संतुलन टिकवणं आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

वन्यजीव सप्ताह अंतर्गत विद्यालयांमध्ये चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये लहान गट प्रथम क्रमांक श्रुती रामदास कडू द्वितीय क्रमांक माहीर मेमन तृतीय क्रमांक मीनाक्षी सिंह, मोठा गट आर्या ढोकरे प्रथम क्रमांक, टीना यादव द्वितीय क्रमांक , मृदुला मुंगळे तृतीय क्रमांक मिळाला. यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. यावेळी शालेय कर्मचारी तसेच ग्रामस्थ ,वनविभाग अधिकारी, कर्मचारी ,उपस्थित होते.

---

# ओबीसी आरक्षण "शिवा" चे 7 ऑक्टोबरला आझाद मैदान मुंबईत धरणे

## भंडारा जिल्हा अध्यक्षांची महाराष्ट्र स्तरिय व्हिडिओ कॉन्फरन्स सभेतून माहिती

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

भंडारा-ओबीसी आरक्षणासाठी राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषद व अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक "शिवा" संघटना येत्या ( मंगळ. ०७ ऑक्टों.) ला मुंबई आझाद मैदानावर ओबीसींच्या न्याय हक्कासाठी पहील्या आंदोलनाचा शंखनाद करीत आहेत. याबाबत ओबीसी परिषद व शिवा संघटनेची ( ०१ सप्टें.) ला राज्य स्तरीय व्हिडिओ कॉन्फरन्स बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत भंडारा जिल्हा अध्यक्ष आशिष चेडगे हे सहभागी झाले होते.

ओबीसींच्या न्याय हक्कासाठी मुंबई उच्च न्यायालयात "त्या" दिशाभूल करणा-या शासन निर्णयाविरोधात पहिली याचिका दाखल करणारी संघटना म्हणजे शिवा संघटना ही ठरली. आणि ओबीसींच्या आरक्षण रक्षणासाठी येत्या ७ ऑक्टोंबरला मुंबई आझाद मैदानावर पहिले आंदोलन छेडणारी संघटना सुद्धा "शिवा" संघटना आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन जो मराठा व ओबीसी समाजाची दिशाभूल फसवणूक करून जो ०२ सप्टेंबरला थोतांड जीआर काढला आहे तो रद्द करावा. नवी मुंबई विमानतळाला ओबीसी भूषण के.डी.वाय. पाटील यांचे नाव द्यावे. हैदराबाद सातारा व इतर गॅजेटीयर प्रमाणे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देत आहात तर दुजा भाव न करता लिंगायत वीरशैव समाजासह गॅजेटीयर मध्ये उल्लेख आलेल्या सर्व जातींना ओबीसी व त्या त्या प्रवर्गात आरक्षणाचा लाभ देण्यात यावा. या मागण्यांसाठी येत्या ०७ ऑक्टोंबरला मुंबई आझाद मैदानावर एकदिवसीय धरणे आंदोलनाला जास्तीत जास्त ओबीसींनी आपल्या न्याय हक्कासाठी आपण एकत्र येऊन मुंबई गाठावी असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषद व शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे, उपाध्यक्ष माजी आमदार शिवशरण अण्णा बिराजदार, सरचिटणीस उमाकांतआप्पा शेटे, रूपेश होनराव, धन्यकुमार शिवणकर, उपाध्यक्ष अभय कल्लावार, दत्ताप्पा खंकरे, वाय. बी. सोनटक्के, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मनिष पंधाडे, उपाध्यक्ष भिमाप्पा खांदे, सुनिल वाडकर, शैलेश जक्कापुरे यांनी केले आहे. तसेच भंडारा गोंदिया जिल्ह्यातील समस्त ओबीसी समाज बांधव, वीरशैव लिंगायत, वीरशैव नाथजोगी, जैन वाणी, लिंगायत जंगम, वाणी समाजबांधवांनी जास्तीत जास्त संख्येने ०७ ऑक्टोंबरला मुंबईत येत या अभूतपूर्व व पहिल्या शंखनाद आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक "शिवा" संघटना भंडारा जिल्हा अध्यक्ष आशिष चेडगे यांनी केले आहे.

